CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज पंढरपुरात; आषाढी पूर्व तयारीचा घेणार आढावा

**सोलापूर :** आषाढीचा मुख्य सोहळा बुधवार १७ जुलै २०२४ रोजी होणार आहे. आषाढीच्या सोहळ्यासाठी राज्यभरातून १५ लाखांपेक्षा अधिक भाविक येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. आषाढी एकादशी पूर्व तयारी याची माहिती घेऊन सुविधांची पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे रविवारी पंढरपुरात येणार आहेत.

सकाळी सकाळी ९ वाजता वर्षा निवासस्थान येथून मोटारीने मुंबई विमानतळाकडे प्रयाण. सकाळी ९.३० वाजता मुंबई विमानतळ येथै आगमन व शासकीय विमानाने बारामती विमानतळ, पुणेकडे प्रयाण. सकाळी १० वाजता बारामती विमानतळ, पुणे येथे आगमन व मोटारीने श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर, श्री क्षेत्र पंढरपूर, जि. सोलापूरकडे प्रयाण. दुपारी १२ वाजता आषाढी एकादशीच्या अनुषंगाने पूर्वतयारी व पाहणी दौरा. दुपारी ३ वाजता मोटारीने बारामती विमानतळ, पुणेकडे प्रयाण. सायंकाळी ५ वाजता बारामती विमानतळ, पुणे येथे आगमन व शासकीय विमानाने मुंबईकडे प्रयाण.



सायंकाळी ५.३० वाजता मुंबई विमानतळ येथे आगमन व मोटारीने वर्षा निवासस्थानाकडे प्रयाण. सायंकाळी ६ वाजता वर्षा निवासस्थान, मलबार हिल, मुंबई येथे आगमन व राखीव असा दौरा असणार आहे. मुख्यमंत्री येणार असल्याने जिल्हा प्रशासनाकडून योग्य ती तयारी व आढावा घेण्यात आला आहे.

www.surajyadigital.com । रविवार, दि. १४ जुलै २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २८५ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# चुकीच्या उपचारातून तरुणाचा मृत्यू; बंगाली तोतया डॉ.विश्वासला बेड्या

● तब्बल १७ नामवंत डॉक्टरांच्या वाळूज गावात भयावह घटना

✔ मोहोळ/सोलापूर/खास प्रतिनिधी

**वाळूज (ता. मोहोळ) येथील सोमनाथ रणजित राक्षे या २२ वर्षीय तरुणाचा बोगस डॉक्टराच्या चुकीच्या उपचारातून मृत्यू झाल्याची धक्कादायकबाब समोर आली आहे. याप्रकरणी बोगस डॉ. अलोक सुशांत विश्वास (वय ३२ रा, बेराबेरीया थाना आमडंगा जिल्हा उत्तर थब्बीस पिजीएस राज्य पश्चिम बंगाल) याच्याविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा मोहोळ पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला असून तोतया डॉक्टरास बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. त्याला सोमवार (ता.१५) पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश मोहोळ न्यायालयाने दिले आहेत.**

विशेष म्हणजे मोहोळ तालुक्यातील वाळूज हे गाव 'डॉक्टरांचे गाव' म्हणून सर्वत्र प्रसिद्ध आहे. वैद्यकिय क्षेत्रातील एम.डी, एमबीबीएस,बीडीएससह बीएमएससारख्या पदव्या धारण केलेली एक दोन नव्हे, तर तब्बल १७ नामांकित डॉक्टरांची फौज या गावची आहे. त्याच नामांकित डॉक्टरांच्या गावात वैद्यकिय क्षेत्रातील कोणती पदवी नसताना शिवाय वैद्यकिय उपचार करण्याचा परवाना नसताना एखाद्या तोतया बंगाली डॉक्टर वर्षानुवर्षे या गावातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळत असेल त्याच्याकडून झालेल्या चुकीच्या उपचारादरम्यान सोमनाथ राक्षे यासारख्या निष्पाप तरुणाचा बळी जात असेल आणि डॉक्टरांचे गाव असलेल्या (पान २ वर)



### गावाबद्दल 'त्या' १७ डॉक्टरांना नसावी का आपुलकी?

वैद्यकीय क्षेत्रातील उच्च पदस्थ पदव्या घेतलेले तब्बल १७ डॉक्टर या गावचे आहेत. ज्यांच्यामुळे वाळूज गावची ओखळच 'डॉक्टराचं गाव' अशी आहे. ज्या डॉक्टराचं लहानपण या गावात गेलं. जे डॉक्टर या गावच्या भूमीतले आहेत. भूमीपुत्र म्हणून वाळूजबद्दल त्यांना सार्थ अभिमान आहे. वाळूज या गावाशी आपली नाळ जुळलेली आहे, ती तुटणार नाही, असं ते अभिमानानं सांगतात. आपल्या नावापुढं ते गर्वानं वाळूज या आपल्या जन्मभूमीचा आवर्जून उल्लेख करतात. ज्या मातीत आपण वाढलो, ज्या गावात वाढलो, ज्या समाजात वाढलो, त्या समाजाचे काहीच उपकार या डॉक्टरांना वाटत नसावे का? गावाबद्दल आपुलकी, आत्मियात काहीच कशी नसावी? १७ डॉक्टर महोदयापैकी एक ही डॉक्टर गावातील नागरिकांना आरोग्याची सेवा देत नाही हे किती विशेष. खास करुन बाब म्हणजे मागच्या सहा वर्षापासून बंगालमधील तोतया डॉक्टर गावातील नागरिकांच्या जीवाशी खेळतोय. आपल्या गावच्या आरोग्याचे धिंडवडे निघताहेत याबद्दल वाळूज गावचे म्हणून सांगणाऱ्या या सर्व १७ डॉक्टर महोदयांना कधीच, काहीच कसे वाटत नसावे, हे दुर्दैवं असल्याची चर्चा वाळूज गावात आणि पंचक्रोशीत सोमनाथ राक्षे या तरुणाच्या मृत्यूनंतर रंगली आहे.



मृत सोमनाथ राक्षे

### मृत राक्षेवर झालेले उपचार चुकीचेच

सोमनाथ रणजित राक्षे हा युवक मृत झाला त्यावर कोणता उपचार केला याबाबत विचारणा केली असता, त्याने सांगितले की, सलाइन डिएनएस सेफ्टॅकझोन व्हिट कोफॉल सी हे मेडीसीन दिले असल्याचे सांगण्यात आले. पथकाच्या म्हणण्यानुसार, तो ॲलोपॅथीचा उपचार करत असल्याचे दिसून आले. यानुसार कोणतीही वैद्यकीय पदवी नसताना तो उपचसार करीत होता.उपचार करण्याकरता शैक्षणिक पात्रता व नोंदणी असणे आवश्यक आहे तसे नसताना तो डॉक्टर म्हणून उपचार करत होता म्हणून अलोक सुशांत विश्वास याचेवर इंडियन मेडीकल कौन्सील क्ट १९६५ कलम १५ (२) व महाराष्ट्र मेडीकल प्रॅक्टीशनर क्ट १९६१ चे कलम ३३ (२) नुसार त्याचेवर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यास अटकही करण्यात आली आहे या घटनेचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक शंकरकुमार ओलेकर हे करीत आहेत.

### खुद्द सरपंच डॉक्टर असूनही आरोग्याची ऐशी-तैशी :

वाळूज गावच्या प्रथम नागरिक डॉ. प्रियंका खरात या स्वत: व्यावसायाने डॉक्टर आहेत. त्यांचे पती डॉ.गणेश खरात हेदेखील डॉक्टर आहेत. दोघांचीही मोहोळ येथे प्रॅक्टीस चालते. दरम्यान गावच्या प्रथम नागरिक आणि त्यातही स्वत: डॉक्टर असताना सरपंच डॉ.प्रियांका यांनी आपल्या वाळूज गावच्या आरोग्याबद्दल काहीच कसे वाटले नाही. बंगाली तोतया डॉक्टरची त्यांनी बेकायदा प्रॅक्टीस कशी चालू दिली? गावच्या कारभारी म्हणून त्यांनी आरोग्याची कोणती जबाबदारी पार पाडली, असे एक ना अनेक प्रश्न अनुत्तरीत राहातात.

### अजून किती जणांचा जीव जाण्याची बघणार वाट?

मोहोळ तालुक्यातील वाळूज येथे बंगाली बोगस डॉक्टराच्या उपचाराने राक्षे या युवकाचा मृत्यू झाला असून या निमित्ताने आणखी तालुक्यात किती ठिकाणी असे विना पदवीचे किंवा कोणतीही वैद्यकीय पदवी पात्रता नसताना लोकांच्या जिवाशी खेळणारे किती डॉक्टर आहेत ? त्यांच्यावरही कारवाई होणार का ? आणखी किती जणांचा जीव जाण्याची वाट आरोग्य विभाग बघणार? हा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

### डॉक्टर विश्वास याच्याकडं ना पदवी ना परवाना

डॉ. जाधव या पथकासह पडताळणी गेल्या त्यावेळी त्या ठिकाणी डॉक्टर म्हणून मिरवणारा तोतया डॉ. विश्वास होता. त्यावेळी किती वर्षापासून उपचार करीत असल्याचे त्याने पथकास सांगितले. तपासणी पथकाने त्यास ज्या पद्धतीचे उपचार करतो त्याचे प्रमाणपत्र तसेच महाराष्ट्र मेडीकल प्रॅक्टीशनर ॲक्ट १९६१ किंवा इंडियन मेडीकल कौन्सील क्ट १९५६ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र आहे का असे विचारले तेव्हा त्याकडे कोणतेही प्रमाणपत्र मिळाले नाही. त्याने दाखलेही नाही.

# सोलापुरातून इलेक्ट्रीक बसचा प्रवास होणार बुंगाट

● परिवहनला ७० ई-बसेस मंजूर
● विकास मंचच्या मागणीला यश

✔ सुराज्य/सोलापूर

पंतप्रधान ई-बस सेवा योजनेअंतर्गत सोलापूर शहरातील रस्त्यांची रुंदी, वळणे, आणि टर्निंग रेडियस यांचा बारकाईने अभ्यास करून, लांबलचक ई-बसच्या ऐवजी सेंट्रल सॅन्क्शनिंग अँड स्टीयरिंग कमिटीने खास सोलापूरसाठी ७० मिडी बसेस आणि ३० नियमित आकाराच्या बसेस मंजूर केल्या आहेत. सोलापूर विकास मंचने केलेल्या मागणीला यश आले आहे.

या ७० मिडी बसेस सोलापूर शहरात सहज फिरू शकतील, वळू शकतील आणि प्रवाशांना अधिक चांगल्या पद्धतीने सेवा देऊ शकतील. केंद्र सरकारकडून संबंधित आशयाचे पत्र सोलापूर महानगरपालिकेला प्राप्त झाले आहे आणि सोलापूर महानगरपालिका परिवहन विभागाने सोलापूर विकास मंचला ही माहिती कळवली आहे. प्रधानमंत्री यांनी जाहिर केल्याप्रमाणे सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाची निवड




पी.एम ई बस सेवेकरीता करण्यात आली. प्रधानसचिव, नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांकडून सोलापूर महापालिका परिवहन उपक्रमास प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचना करण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे सविस्तर प्रस्ताव प्रधानसचिव यांचेकडे दि. ६ सप्टेंबर २०२३ ने प्रस्ताव सादर केला. महाराष्ट्र शासनाच्या शिफारशीने हा प्रस्ताव पी एम ई बससेवा, मिनीस्ट्री ऑफ हौसिंग ॲन्ड अर्बन अफेअर्स ॲड पेट्रोलियम अँड नॅचुरल गॅस, गव्हेंमेंट ऑफ इंडिया यांचेकडे सादर करण्यात आला होता.दरम्यान, केंद्र शासनाने सोलापूर महानगरपालिकेस दि. २ नोव्हेंबर २०२३ च्या सेंट्रल सॅक्शनिंग ॲड स्टेअरिंग कमिटी (सी.एस.एस.सी) यांच्या दि. १९ ऑक्टोबर २०२३ रोजीच्या बैठकीमध्ये मिडी ७० बसेस व ३० स्टैंडर्ड (नियमित) बसेस मंजूर केल्या आहेत. तशाप्रकारेच ऑफिस मेमोरेंडम दि. २ नोव्हेंबर २०२३ रोजी प्रसिध्द केले. सोलापूर शहर विकास मंचच्या मागणीप्रमाणे सोलापूर शहराकरीता लांबलचक ऐवजी ७० मिडी ई बसेस मंजूर केलेल्या आहेत व उर्वरित या स्टैंडर्ड बसेस आहेत. या बसेस बॅटरीवर चालणा-या व पर्यावरणपूरक आहेत. याबाबतची माहिती महापालिका परिवहन उपक्रम कार्यालय २०१४ साली केंद्र सरकारच्या जे.एन. एन.यु.आर.एम योजनेअंतर्गत मिळालेल्या १४४ बसेस फार कमी काळ चालल्या आणि सध्या त्या भंगार अवस्थेत आहेत. सोलापूर विकास मंचने सोलापूर शहरातील रस्त्यांची रुंदी, वळणे, आणि टर्निंग रेडियस यांचा बारकाईने अभ्यास करून, लांबलचक ई-बसच्या ऐवजी मिडीबस उपयुक्त ठरतील, अशी अभ्यासपूर्ण मागणी केली होती.

### टेंडर आणि चार्जिंग स्टेशनसाठी प्रक्रिया सुरू

दरम्यान, या १०० ई बसेस खरेदीसाठी शासन स्तरावर टेंडर काढण्यात येणार आहे. त्याचबरोबर शहरातील न्यू बुधवार पेठेतील जुन्या बस डेपोच्या जागेवर चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक असणारी लाईन महा वितरण कडून करून देण्यात येणार आहे. या सर्व प्रक्रिया पार पडल्यानंतर या बसेस महापालिका परिवहन उपक्रमास मिळणार आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



जनसेवा हीच ईश्वसेवा !

कल्याण
177-55-168

# 'ती' निष्पाप बिचारी यमसदनी पोचल्यावर आलं चेंबरवर झाकण

● ड्रेनेजबद्दल उशीरा दक्षत घेऊन महापालिका प्रशासनाने तोडले अकलेचे तारे
● आईविना पोरक्या झालेल्या दोन मुलांच्या आयुष्याचा प्रश्न गंभीर

✔ सुराज्य/सोलापूर

जुना पुना नाका स्मशानभूमी जवळील ड्रेनेज मध्ये बेशुद्ध अवस्थेत मिळून आलेल्या महिलेचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याच्या दुर्घटनेनंतर महापालिका खडबडून जागे झाले आणि अखेर आज शनिवारी दुपारी त्या उघड्या चेंबरवर सिमेंटचे झाकण ठेवण्यात आले.



मंगल कांबळे

दरम्यान, आई विना पोरक्या झालेल्या दोन मुलांच्या आयुष्याचा प्रश्न आता गंभीर बनला आहे. ती बिच्चारी अभागी महिला यमसदनी पोचल्यावर प्रशासनाने अकलेचे तारे तोडले अन् ड्रेनेज झाकले. जुना पुना नाका स्मशानभूमी लगत झोपडीत राहणाऱ्या मंगल उर्फ पिंकी पिंटू कांबळे (वय वर्षे ३४) महिलेचा शुक्रवारी जुना पुना नाका स्मशानभूमी लगत ड्रेनेजमध्ये बेशुद्ध अवस्थेत मिळून आल्या. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय (पान २ वर)

### 'त्या' चेंबर परिसरात अस्वच्छतेचे साम्राज्य जैसे थे

जुना पुना नाका स्मशानभूमी जवळील त्या चेंबर परिसरात अजोरा आणून टाकण्यात आलेला आहे तसेच कचरा ही साचला आहे. अस्वच्छतेचे साम्राज्य या घटनेनंतरही आजही कायम असल्याचे दिसून आले. चिखलही साचला आहे.

**मुलांच्या पोरकेपणाचं काय? :** आईचा ड्रेनेज मध्ये पडून मृत्यू झाला त्यानंतर या महिलेची दोन मुलं आता पोरकी झाली आहेत. एक मुलगा शुभम हा इयत्ता पाचवीत तर दुसरा मुलगा प्रेम हा इयत्ता सातवीत शिकत आहे. हे दोन दोन्ही मुले आता आईच्या प्रेमाला मुकली आहेत. त्या झोपडीत आजी सोबत ती मुले राहतात. त्यांच्या पुढील शिक्षण, आयुष्याचा आणि भविष्याचा प्रश्न आता गंभीर झाला आहे. महापालिका प्रशासन आणि सामाजिक संस्थांनी त्यांना आधार देण्याची गरज वर्तवली जात आहे.

विनम्र अभिवादन




स्व.राजेश (अण्णा) विष्णुपंत कोठे

सहवसा जरी सुटला स्मृती सुंगध देत राहील,
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर आठवण तुमची येत राहील.
आपल्या स्मृतीस जयंतीनिमित्त भावपूर्ण श्रध्दांजली!

सुराज्य सोलापूर
परिवार, सोलापूर

## संक्षिप्त वृत्त



### साध्वी प्रज्ञाश्रीजी यांचा सोलापूर शहरात आज मंगल प्रवेश

**सोलापूर :** येथील श्री. जैन श्वेतांबर स्थानकवासी श्रावक संघातर्फे आयोजित चातुरमासानिमित्त स्वाध्यायप्रेमी प .पु .श्री. साध्वी प्रज्ञाश्रीजी यांचे रविवार दि. १४ जुलै रोजी बलिदान चौक येथील जैन स्थानकात मंगल प्रवेश होणार आहे. प.पू. किरणसुधाजी म.सा. यांच्या सुशिष्या पूज्य साध्वी प्रज्ञाश्रीजी यांचे समवेत प्रवचन प्रभाविका प्राचीश्रीजी ,मधुर वक्ता प्रसन्नाजी,जिनशासन प्रभाविका प्राप्तीश्रीजी म .सा .यांचे देखील आगमन होणार आहे अशी माहिती संघाचे अध्यक्ष पदम राका व सचिव जितेंद्र बलदोटा यांनी दिली. रविवार दिनांक १४ जुलै रोजी सकाळी ८ वा. सम्राट चौक येथील हरी पदम सोसायटी येथून विहार यात्रेस प्रारंभ होणार आहे. १९ जुलैपासून दररोज सकाळी ६ ते ७प्रार्थना,९ ते १० प्रवचन ,२.३०ते ४.३० धर्मचर्चा ,६ ते ७.३० प्रतिक्रमण,८.३०ते ९.३० समाज बांधवांशी धर्मचर्चा असे कार्यक्रम चार महिने चालणार आहेत, पदम राका व जितेंद्र बलदोटा यांनी सांगितले.

### खिडकीतून हात घालून बार्शीत वृद्ध महिलेचे दागिने पळवले

**बार्शी :** घरातील वृद्ध महिलेस पत्ता विचारण्याचा बहाणा करीत एका चोरट्याने त्यांच्या गळ्यातील २० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन हिसका मारून घेऊन पोबारा केला. ही घटना बार्शी येथील कसबा पेठेत गुरुवारी रात्रीच्या सुमारास घडली.या प्रकरणात बार्शीच्या पोलिसांनी एका तरुणाविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात कुसुमदेवी गुप्ता (वय ८० रा. कसबा पेठ) पोलिसात फिर्याद दाखल केली.

# वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी लवकरच कल्याणकारी मंडळ : मुख्यमंत्री

## राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेतर्फे मुख्यमंत्र्यांसह आ. केळकर यांचा सत्कार

**नाझरे/प्रतिनिधी**

वृत्तपत्र विक्रेत्यांच्यासाठी स्वतंत्र वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळ लवकरच कार्यान्वित करू, असे आश्वासन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. यावेळी ठाण्याचे आमदार संजय केळकर उपस्थित होते. विधानसभेमध्ये आमदार केळकर यांच्या प्रश्नांवर बोलताना मुख्यमंत्री शिंदे यांनी वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी कल्याणकारी मंडळ करण्याची घोषणा केली, त्याबद्दल महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने विधानभवनमध्ये मुख्यमंत्री शिंदे व आमदार केळकर यांचा सत्कार करण्यात आला. विधानसभेत केलेल्या घोषणेप्रमाणे हे कल्याणकारी मंडळ लवकर कार्यान्वीत करावे अशी मागणी करण्यात आली.

आमदार संजय केळकर यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष सुनिल पाटणकर, कार्याध्यक्ष बालाजी पवार, सरचिटणीस विकास सूर्यवंशी, कोषाध्यक्ष राजेंद्र टिकार, व्यवस्थापन समिती सदस्य दत्तात्रय घाडगे, संजय पावसे, गोपाळ चौधरी यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री शिंदे यांच्याशी चर्चा केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, आपण अनेक दिवस मागणी करत आहात.

आमदार केळकर यांनी अनेकदा हा प्रश्न विधानसभेत मांडला आहे.



मुंबई : महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने विधानभवनमध्ये मुख्यमंत्री शिंदे व आमदार केळकर यांचा सत्कार करण्यात आला.

लवकरच अगदी विधानसभा निवडणूक पूर्वी वृत्तपत्र विक्रेत्यांच्यासाठीचे कल्याणकारी मंडळ कार्यान्वित करू. केळकर यांनी यावेळी सांगितले, महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटना या ही राज्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांची एकमेव शिखर संघटना आहे. या संघटनेच्या माध्यमातून गेली पंधरा वर्षे वृत्तपत्र विक्री त्यांच्यासाठी कल्याणकारी मंडळ करावे अशी मागणी करण्यात येत आहे.

पाटणकर यांनी सांगितले, अभ्यास समितीने सुचवल्या प्रमाणे, वृत्तपत्र विक्रेत्यांच्या मुलांना शैक्षणिक सवलती मिळाव्यात, शिष्यवृत्ती मिळावी, वृत्तपत्र विक्रेत्यांच्या मुलांना उच्च शिक्षणात सवलती मेळाव्यात, वृत्तपत्र विक्रेत्यांच्यासाठी आरोग्याच्या खर्चाबाबत मदत मिळावी, उतार वयात वृत्तपत्र विक्रेत्यांना निवृत्तीवेतन (पेन्शन) मिळावी, वृत्तपत्र विक्रेत्यांना घरबांधणीसाठी जागा व निधी मिळावा यासह विविध योजनांचा सहभाग वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळाच्या मार्फत करावा. तशी शिफारस संघटनेने अभ्यास समितीच्या माध्यमातून सरकारकडे केली आहे. सरकारने या अभ्यास समितीच्या अहवालाचा स्वीकार करून वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी तत्काळ स्वतंत्र कल्याणकारी मंडळ गठीत करावे.

कार्याध्यक्ष बालाजी पवार, सरचिटणीस विकास सूर्यवंशी यांनी वृत्तपत्र विक्रेत्यांची स्थिती व कल्याणकारी मंडळाची गरज याबाबत निवेदन देण्यात केले.



सोलापूर : रेल्वे कॉलनी येथे चिल्ड्रन पार्कचे उद्घाटन नीरज दोहरे यांच्या हस्ते करण्यत आले.

### रेल्वे कॉलनी येथे चिल्ड्रन पार्क अन् ओपन जिमचे उद्घाटन

**सोलापूर :** मध्ये रेल्वेच्या सोलापूर विभागातील, सोलापूर गणेश हॉल या ठिकाणी नवीन चिल्ड्रन पार्क आणि ओपन जिम चे उद्धघाटन विभागीय रेल्वे व्यवस्थापक नीरज कुमार दोहरे यांच्या हस्ते करण्यात आले आहे.

सोलापूर कर्मचारी लाभ निधीच्या सौजन्याने पार्क ची निर्मिती करण्यात आली आहे. विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री. नीरज कुमार दोहरे यांच्या हस्ते सर्व प्रथम पार्क मध्ये वृक्षारोपण करण्यात आले, या वेळी विभागीय रेल्वे व्यवस्थापक म्हणाले कि,''रेल्वे कर्मचाऱ्यांच्या परिवारातील लोकांना काही वेळ निवांत बसण्यासाठी, मुलांना खेळण्यासाठी ह्या पार्क ची निर्मिती करण्यात आली आहे.

या वेळीही मुख्य चिकित्सा अधिकारी डॉ. आनंद कांबळे, वरिष्ठ विभागीय अभियंता (समन्वय) सचिन गणेरे, वरिष्ठ विभागीय सिग्नल आणि दूरसंचार अभियंता राहुल गौड, वरिष्ठ विभागीय यांत्रिकी अभियंता रामलाल प्यासे, विभागीय सुरक्षा आयुक्त आदित्या, वरिष्ठ विभागीय संरक्षा अधिकारी पी. रामचंद्रम, सचिव कर्मचारी लाभ निधी आणि सहायक कार्मिक अधिकारी शेख मस्तान आणि रेल्वे कॉलनीतील रहिवासी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन महावीर नेमानी (मुख्य वेल्फेअर निरीक्षक), टी. व्ही. वाघमारे (एससी एसटी सदस्य), संजय पवार (एनआरएमआयु सदस्य), संतोष गुरव (सीआरएमएस सदस्य), हर्षल धात्राक ऑल इंडिया (इतर मागासवर्गीय सदस्य) आणि सुधीर कुमार सिंह यांनी केले.

पान १ वरुन...

### बंगाली तोतया डॉ.विश्वासला बेड्या

गावच्याच आरोग्याचे धिंडवडे निघतील असतील ही बाब अत्यंत दूर्दैवी मानली जात आहे. मृत सोमनाथ रणजित राक्षे (वय २२) हा तरुण वाळूजचा रहिवासी होता. त्याला डोकेदुखी आणि पित्तचा त्रास होऊ लागल्यानंतर गावातील डॉ. अलोक विश्वास या बंगाली डॉक्टरकडे उपचारासाठी गुरुवारी (ता.११) रात्री साडेआठ वाजण्याच्या दरम्यान उपचारासाठी नेले होते. डॉ. विश्वास याने राक्षे याच्यावर उपचारदेखील सुरु केले. राक्षे या तरुणास सलाईन सुरु लावण्यात आले होते. याच टप्यावर राक्षे याचा त्रास अधिक वाढला. त्याला उलट्याचा त्रास सुरु झाला. पुढच्या अवघ्या काही तासात राक्षे या तरुणाची प्रकृती अधिकच गंभीर झाली तेव्हा त्याला मोहोळ येथील शासकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी हलविण्यात आलं. येथील रुग्णालयात उपचार करण्यापूर्वीच राक्षे याचा मृत्यू झाल्याचं मोहोळच्या शासकिय रुग्णालयामधील डॉक्टरांनी घोषित केले. तद्नंतर राक्षे या तरुणाचा मृतदेह वाळूज येथे आणून त्याच्यावर अत्यंसंस्कार करण्यात आले. दरम्यान नरखेड प्राथमिक आरोग्य केंद्रातील डा॑. तेजस्वीनी तात्यासो जाधव यांनी मृत राक्षे याच्या मृत्यूप्रकरणी अलोक सुशांत विश्वास यास जबाबदार धरुन त्याच्याविरुद्ध मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

**तोतया डॉक्टरच्या कारनाम्याचा असा झाला भांडाफोड**

सोमनाथ राक्षे या तरुणावर बंगाली डॉ. अलोक सुशांत विश्वास यांच्याकडून चुकीचे उपचार झाल्याने त्याचा मृत्यू झाला. यासंबंधीची तक्रार दाखल झाल्यानंतर नरखेड प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ. तेजस्विनी जाधव यांचं पथक वाळूजमध्ये तातडीनं दाखल झालं. इथल्या ग्रामस्थांकडून त्या तोतया डॉक्टरबद्दल माहिती घेण्यात आली. तद्नंतर त्या डॉक्टरचा जिथे दवाखाना आहे, त्याची पडताळणी करण्यात आली त्यावेळी समोर आलेली माहिती अंगावर काटे उभा राहणारी होती.

**बोगस डॉक्टरांचा मुद्दा चर्चेत पण कारवाई शुन्यच**

सोलापूर जिल्ह्यात बऱ्याच गावात असे बोगस डॉक्टर आहेत त्यांची बिनबोबाट प्रॅक्टीस सुरु आहे. तालुका वैद्यकीय अधिकारी यांनी व त्यांच्या पथकाने तपासणी वरून ग्रामीण भागात नागरीकांच्या जिवशी खेळणारे तोतया डॉक्टर वर शोधून कारवाई करावी अशी मागणी जनतेतून होत असते. बोगस डॉक्टरांचा मुद्दा घटना घडल्या की ऐरणीवर येतो. मात्र कारवाई शुन्यच. असाच तो प्रकार.

### ‘ती’ निष्पाप बिचारी यमसदनी...

येथे दुपारी तीनच्या सुमारास उपचारासाठी दाखल केले असता उपचारापूर्वीच मयत झाली असल्याची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे. या दुर्घटनेमुळे सोलापूर महापालिका प्रशासन प्रशासनाच्या विरोधात मृत महिलेच्या नातेवाईक आणि नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

दरम्यान, त्या महिलेचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर सोलापूर महापालिका प्रशासनाचा संबंधित विभाग खडबडून जागा झाला.

आज दुसऱ्या दिवशी शनिवारी दुपारी महिला पडलेल्या त्या उघड्या चेंबरवर सिमेंटचे झाकण ठेवण्यात आले. तेही छोट्या आकाराचे झाकण ठेवण्यात आले आहे. अपुऱ्या झाकणावर मुळे साईडला पुन्हा फट राहिली असल्याचे दिसून येते. यामुळे हे झाकण तरी आवश्यकतेनुसार त्या आकाराचे टाकण्याची गरज आहे. महापालिका उपायुक्तांसह संबंधित झोन आणि आरोग्य अभियंता यांनी घटनास्थळी भेट देऊन आवश्यक ती कार्यवाही करण्याची गरज वर्तवली जात आहे.

### लोणार येथे डोळ्यात तिखट टाकून मारहाण

**मंगळवेढा :** दुसऱ्याच्या लग्नात मामाला बोलल्याच्या कारणावरून भाच्यास पळवून नेऊन डोळ्यात तिखट टाकून कुऱ्हाडीने मारहाण करण्यात आली. या प्रकरणात मंगळवेढाच्या पोलिसांनी जखमींचे मामा आणि त्याच्या दोन मुलाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. नवनाथ केरप्पा होळकर असे जखमींची नावे आहे. याप्रकरणी त्यांचे मामा मधु नरळे, त्याची दोन मुले सचिन आणि रखमाजी नरळे (सर्व रा.लोणार) या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. तिघेजण होळकर यांच्या घरी गेले आणि तू आमच्या वडिलांना वाकसे यांच्या लग्नात काय बोलला? असे म्हणत त्यांना डोळ्यात चटणी टाकून मारहाण केली.

## नवीन घरकुल येथे नशेत आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर/प्रतिनिधी**

कुंभारी घरकुल तालुका दक्षिण सोलापूर येथे राहणाऱ्या नागेश वीरस्वामी यामा वय ४० यांनी दारूच्या नशेत विश करून आत्महत्याचा प्रयत्न केला ही घटना बुधवारी दुपारच्या सुमारास घडते दुपारी दोन वाजेच्या सुमारास त्यांनी मेसेज अंगणात शाळा मारण्याचे पिवळे विषारी रंग प्राशन केले होते त्याला कृष्णा भाऊ यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

**एसटी स्टँडजवळ ब्लेडने मारहाण**

सोलापूर : बस स्थानकाजवळील रिक्षा स्टॉप जवळ ब्लेड आणि हाताने केलेल्या मारहाणीत प्रशांत विजय सकट (वय २५ रा.जय मल्हार चौक, बुधवार पेठ) हा तरुण जखमी झाला. ही घटना शुक्रवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास घडली. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. अजय कटारे याने त्याला मारहाण केली अशी नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे.

**आष्टी येथे शेतीच्या वादातून मारहाण**

सोलापूर : आष्टी (ता.मोहोळ) येथे शेतीच्या वादातून लोखंडी वस्तू आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत दत्तात्रय काशिनाथ साठे (वय ५५ ) हे जखमी झाले .ही घटना शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. त्यांना मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून सुरज (मुलगा) यांनी सोलापूरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले. गणेश हनुमंत साठे याने त्यांना मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

**तलावात अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला**

सोलापूर : विजापूर रोडवरील छत्रपती संभाजी तलावात एका ३५ ते ४० वर्षीय अनोळखी युवकाचा मृतदेह पाण्यावर तरंगताना शनिवारी दुपारी आढळून आला. मयत हा रंगाने सावळा असून, त्याच्या अंगावर चौकडा फुलबाहीचा शर्ट आणि फिकट निळ्या रंगाची पॅन्ट आहे. यासंबंधी कोणास माहिती असल्यास त्यांनी सदर बझार पोलीस ठाण्यातील हवालदार वाघमारे यांच्याकडे संपर्क साधावा.

## पेनूर येथे शालेय वर्गांच्या इमारतीचे उद्घाटन

**सोलापूर/प्रतिनिधी**

पेनूर ता. मोहोळ येथील आर. आर. पाटील हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज यांच्या नवीन इमारतीचा उदघाटन सोहळा मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत संपन्न झाला. राऊंड टेबल इंडिया या सामाजिक व शैक्षणिक बांधिलकी जपणाऱ्या संस्थेच्या माध्यमातून प्राप्त देणगी व पी. अँड जी. शिक्षा व बालाजी अमाईन्स उद्योग समूह यांच्याद्वारे देण्यात आलेल्या देणगी मधून शाळेची भव्य इमारत बांधण्यात आली.

केवळ १५० दिवसांमध्ये बांधून पूर्ण झालेल्या या भव्य इमारतीचे उदघाटन बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी यांच्या हस्ते संपन्न झाले. राऊंड टेबल इंडियाचे एरिया चेअरमन तरंग शहा यांनी सर्वांना राऊंड टेबल संस्थेच्या कार्याबद्दल माहिती देताना सांगितले की, या संस्थेने मागील २० वर्षामध्ये रु. ४८५ कोटींच्या निधीतून ९२१९ वर्ग खोल्या संपूर्ण भारतात बांधून दिलेल्या आहेत. ज्यामुळे १ कोटी १लाख ५० हजार विद्यार्थ्यांना याचा लाभ झाला आहे.

डी. राम रेड्डी बालाजी अमाईन्स कंपनी तर्फे सी. एस. आर. निधीमधून सोलापूर जिल्ह्यामध्ये होत असलेल्या विविध उप्रकमांची माहिती दिली. वशेषत: राऊंड टेबलचे सदस्य प्रथम स्वत: देणगी देतात व नंतर इतर देणगीदार व कंपन्याकडून सहकार्य घेतात याचा आवर्जून उल्लेख करुन त्यांनी यापुढेही बालाजी अमईन्स राऊंड टेबल इंडिया या संस्थेसोबत सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील गरजू शाळेंच्या विकासासाठी सदैव कार्यरत राहील असे राम रेड्डी यांनी भावना व्यक्त केली. पेनूर व पंचक्रोशीत शिक्षण घेणाऱ्या एक हजार विद्यार्थ्यांना आता या शाळेमुळे मोहोळ किंवा पंढरपूर पर्यंत शिक्षणाकरिता जाण्याची मुलांची वणवण थांबली आहे, असे मानाजी (बापू) माने, यांनी सांगितले.

चेअरमन अनुप मालपाणी यांनी जाहीर केले. या वेळी तरंग शहा, एरिया चेअरमन राऊंड टेबल इंडिया, सुमित गुप्ता एरिया सेक्रेटरी राऊंड टेबल इंडिया, रोहित राठी वासुदेव बंग, अभिजीत मालानी, पुष्कराज, अँड ज्युनियर कॉलेज पेनुर विक्रांत माने अध्यक्षा वंदना माने व डी. डी. रणदिव,नामदेवजी पाटील हे उपस्थित होते.




सोलापूर : वर्गखोल्यांच्या उद्घाटनप्रसंगी उद्योगपती राम रेड्डी आदी मान्यवर.

- **राऊंड टेबल इंडिया व बालाजी अमाईन्स यांच्या वतीने ६० लाखांचा निधी**
- **आठ वर्गासह शाळेची भव्य इमारत**

**श्री गजानन महाराज पालखीला**

### रॉबिन हूड आर्मीकडून ५१९ किलो धान्य

**सोलापूर/प्रतिनिधी**

आषाढी यात्रेसाठी शेगावहून पंढरपूरला निघालेल्या श्री संत गजानन महाराज पालखीतील वारकऱ्यांसाठी समाजाने दिलेले तब्बल ५१९ किलो धान्य रॉबिन हुड आर्मीकडून श्री संत गजानन महाराज संस्थानला सुपूर्द करण्यात आल्याची माहिती हिंदुराव गोरे यांनी दिली.

आतापर्यंत सात वर्षांमध्ये सात लाखांपेक्षा जास्त गरजूंना अन्न पोहोच करण्यात आले आहे. त्याचबरोबर विविध समाजपयोगी उपक्रम देखील राबविले जात आहेत. सोलापूरमध्ये मुक्काम असणाऱ्या श्री गजानन महाराज पालखीतील वारकरी व संप्रदायासाठी धान्य देण्याचे आवाहन रॉबिन हूड आर्मी केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत सोलापूरकरांनी पालखी ड्राईव्ह या उपक्रमामध्ये एकूण ५१९ किलो धान्य, पदार्थ व जीवनावश्यक वस्तू दिल्या आहेत.

शेगाव ते पंढरपूर गजानन महाराजांच्या पालखीत चालत जाणाऱ्या वारकऱ्यांच्या धान्य, देण्याचे आवाहन रॉबिन हूड आर्मी केले होते. यानंतर सोलापूरकरांनी किराणा साहित्य दिले. तसेच पावसापासून संरक्षण व्हावे म्हणून छत्र्यांचे वाटप देखील करण्यात आले.हे साहित्य पालखी प्रमुख सतीश पुकट यांच्याकडे सुपूर्द केले.



सोलापूर : राबिन हूड आर्मीकडून श्री गजानन महाराज पालखी सोहळ्यासाठी वारकऱ्यांसाठी धान्य देण्यात आले.

## मोटरसायकल चोरीसह मोबाईल चोरीचे गुन्हे उघडकीस

**१ लाख ८० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत**

**सोलापूर/प्रतिनिधी**

शहरातील वेगवेगळ्या ठिकाणाहून मोटरसायकल चोरी करणाऱ्या विविध चार गुन्ह्यातील चार मोटारसायकल व दोन मोबाईल हस्तगत करून पोलिसांनी अटक केली आहे.त्यांच्याकडून एक लाखांच्या हजार रुपये किमतीच्या माध्यमात हस्तगत करण्यात शहर गुन्हे शाखेला यश आले आहे.

शहर परिसरात मोटरसायकल चोरींच्या गुन्हेगारांचा शोध घेत असताना गुप्त बातमीदारा मार्फत मिळाली की, शांतीनगर येथील आसिफ शेख यांच्याकडे दोन नंबर प्लेट नसलेल्या मोटरसायकल असून त्या चोरीच्या आहेत. त्याप्रमाणे सपोनी संदीप पाटील व त्यांच्या पथकाने मिळालेल्या माहितीनुसार आसिफ शेख (वय-३५,रा. अशोक कामगार सोसायटी,शांतीनगर नई जिंदगी) यास ताब्यात घेतले.शेख यांच्याकडे अधिक तपास केला असता त्यांने चोरीच्या मोटरसायकल विकत घेतल्याचे कबूल केले. त्याप्रमाणे त्याच्याकडून मोटरसायकली जप्त करण्यात आल्या.त्याचबरोबर सपोनी.महाडिक व त्यांच्या पथकास गुप्त बातमीदारांनी दिलेल्या माहितीनुसार एक इसम चोरी केलेला मोबाईल घेऊन कुमार करजगी कॉम्प्लेक्स येथील मोकळ्या मैदानात उभा आहे. त्याद्वारे आरोपी कृष्णा विलास जगदाळे (वय-३४,रा.डोणगाव मराठी शाळेसमोर सोलापूर) यास ताब्यात घेतले असता,त्याच्याकडे एक विवो कंपनीचा मोबाईल मिळून आला.तसेच विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीत रेडमी कंपनीचा मोबाईल चोरीस गेला होता. हा मोबाईल रवींकुमार महादेवआप्पा संतम यांच्याकडून जप्त करून सदरील गुन्हा उघडकीस आणाला.

## राग मनात धरून रॉडने मारहाण; तिघांवर गुन्हा

**सोलापूर/प्रतिनिधी**

मागील तक्रारीचा राग मनात धरून शिवीगाळ करत लोखंडी रॉडने मारहाण केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ११ जुलै रोजी रात्री साडेनऊ वाजता नळ बझार चौक येथे घडली.याप्रकरणी सरदार किसन बोधीवाले (वय-४०,रा.लोधी गल्ली,आर के व्हिडिओ जवळ,बेडरपूल) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून विकी फटफटवाले,रेखा फटफटवाले,राज फटफटवाले (सर्व.रा.लोधी गल्ली,उत्तर सदर बजार) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी हे मोबाईल मध्ये बॅलन्स भरण्याकरिता जगदंबा चौक येथे जात असताना वरील ठिकाणी त्यांचा फिर्यादीचा लहान भाऊ गणेश बोधीवाले याच्याशी मागे झालेल्या तक्रारींचा राग मनात धरून फिर्यादीस शिवीगाळ करत लोखंडी रॉड डोक्यात घालून जखमी केले.तसेच रेखा आणि राज यांनी मिळून फिर्यादी यांना व त्यांची पती लक्ष्मी व मुलगा रितिक यांना शिवीगाळ करून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.

**संगेवाडी येथे दुकानाचा पत्रा कापून इलेक्ट्रिक साहित्य पळवले**

सांगोला : बंद असलेल्या दुकानाचा पत्रा कापून चोरट्याने दुकानातील पाणबुडी मोटर, मोनोब्लॉक मोटर आणि इतर इलेक्ट्रिक साहित्या असा ६५ हजाराचा माल पळविला. ही चोरी संगेवाडी येथील मामाभाचे या दुकानात घडली.

या संदर्भात अजित सदाशिव पवार यांनी सांगोला पोलिसात तक्रार दाखल केली. ते गेल्या गुरुवारी आपले दुकान बंद करून घरी गेले होते. शुक्रवारी पहाटेच्या सुमारास दुकानाच्या साईडचा पत्रा कापून चोरटा आत प्रवेश केला. आणि वरील साहित्या चोरून नेले.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाच वेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR/२००२/०९७०७. Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळये.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य सोलापूर

## हगलूर येथे ट्रक अपघात ; दुचाकीस्वार ठार

**सोलापूर :** वेगाने जाणाऱ्या ट्रकच्या धडकेने दुचाकी वरील ५८ वर्षीय इसम गंभीर जखमी होऊन मरण पावले. हा अपघात काल शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास तुळजापूर मार्गावरील हगलूर गावाजवळ घडला .

नवनाथ दिगंबर गायकवाड (वय ५८ रा. कुरुल ता.मोहोळ) असे मयताचे नाव आहे. ते शुक्रवारी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास तुळजापूर ते सोलापूर असा दुचाकी वरून प्रवास करीत होते. हगलूर येथील सौरभ हॉटेल जवळ समोरून आरजे१८-जीबी-६०७१ या क्रमांकाच्या ट्रक धडकल्याने ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना म्बुलन्स मधून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वी मयत झाले. या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली. प्राथमिक तपास हवालदार स्वामी करीत आहेत.

### दुचाकी घेऊन गेल्याप्रकरणी एकावर गुन्हा

सोलापूर : दुचाकी घेऊन गेल्याप्रकरणी एका जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १९ ते २५ एप्रिल दरम्यान जुनी मिल कंपाऊंड येथील साईट ऑफिसच्या बाहेर घडली.याप्रकरणी विरेंद्र रामलाल यादव (वय-४७,रा.स्नेहा रेसिडेन्सी,मुरारजी पेठ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून राजकुमार भीमाशंकर उडचण (रा.निराळे वस्ती,मुरारजी पेठ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार भालशंकर हे करीत आहेत.



# सोलापूरच्या मुरारजी पेठेतील सुपर मार्केटमध्ये

# ‘रात्रीस नव्हे; दिवस-रात्र खेळ चाले मद्यपी अन् चिलीम बहाद्दरां’चा

- मार्केटसह परिसरात दारुडे अन् गांजाखासांची भलतीच दशहत
- पोलीस अन् महापालिकेचे अक्षम्य दूर्लक्ष
- मार्केटमध्येच दारु, गांजाची राजरोस विक्री
- दहशतीमुळे महिलांनी भाजी खरेदीला येण्याकडे फिरवली पाठ
- भाजी विक्रेत्या महिलांसह विद्यार्थी, असुरक्षित



सोलापूर : येथील मुरारजी पेठ परिसरातील महापालिकेच्या सुपर मार्केटसह परिसरात दारुडे आणि गांजा पिणारे यांचा असा दिवस-रात्र वावर असतो, ज्यामधून त्यांची दहशत निर्माण झाल्याचे चित्र आहे.

सोलापूर/प्रतिनिधी

एकेकाळी सोलापुरातील मुरारजी पेठेतील सुपर मार्केट हे भाजीमंडईसाठी प्रसिद्ध मार्केट म्हणून ओळख झाली होती. या मार्केट मध्ये ५० पेक्षा अधिक भाजी विक्रेते भाजीपाला विकायला बसायचे. तसेच या परिसरात महाविद्यालये, चाळ, अपार्टमेंट यामुळे मार्केटमध्ये गर्दी पाहायला मिळायची. आता हेच मार्केट खास मद्यपी-चिलीम बहाद्दरांसाठी प्रसिद्ध होत आहे.

या ठिकाणी भाजी विक्रेते दिसणार नाहीत पण येथे मद्यमी आणि चिलीम फुकणारे बहाद्दर पाहायला मिळतील. याचा परिणाम सुपर मार्केटवर झाला असून, सध्या मार्केटमध्ये शुकशुकाट दिसत आहे. दारुडे आणि गांजाखासांच्या दहशतींमधून भाजी विक्रेत्या महिला, या मार्गावरुन जाणारे विद्यार्थी आणि भाजी खरेदी करण्यासाठी अत्यंत अल्प प्रमाणात येणाऱ्या महिला हे असुरक्षित आहेत.

महापालिकेच्या मालकीच्या ज्या सुपर मार्केटमध्ये भाजीपाला, भाजी विक्रेते, ग्राहक हे दिसायला हवेत. मात्र आता या ठिकाणी पडलेल्या रिकाम्या दारूच्या बॉटल्या, दारुचे ग्लास आदी आक्षेपार्ह गोष्टींचे दर्शन घडत आहे. येथील या प्रकाराबाबत ना महापालिकेला देणे-घेणे नाही ना पोलीस प्रशासनाला सोयरसुतक नाही. मागच्या अनेक वर्षापासून सुरु असललेल्या या प्रकाराकडे दुर्लक्षच आहे. सुपर मार्केट हे महाविद्यालय परिसरात असून अनेक वर्षांपासून मद्यपी-चिलीम शौकिनांचा हा अड्डा बनविला आहे. महाविद्यालय परिसरात दुपारच्या वेळी मद्यपी-चिलीम बहाद्दरांची जत्रा भरत असून जागा भेटेल तिथे येथेच दारू पिऊन धिंगाणा घालण्याचा नसता उद्योग येथे वाढत आहे. याचा परिणाम विद्यार्थ्यांवर तसेच भाजी मंडईत भाजी विक्रीसाठी बसणाऱ्या महिलांवर होत आहे.

### दारु-गांजा विकणाऱ्यास कोणत्या नेत्याचा आशीर्वाद ?

सुपर मार्केट ठिकाणी मद्यपी-चिलीम बहादुरांना दारु, गांजा व चिलीम त्या ठिकाणी बिनधास्त पुरवली जाते. शाळा, महाविद्यालय परिसरात दारु, गांजा आदी नशिले पदार्थ विकण्याला कायद्याने बंदी घातली आहे. तरीपण सुपर मार्केट परिसरातील तीन महाविद्यालयांच्या अगदी नजिक दारु आणि गांज्याची बिनधास्त विक्री होत आहे. दारु आणि गांजा विकणाऱ्यास कोणाचे अभय आहे. यामागे कोणत्या नेत्याचा आशीर्वाद असा सवाल उपस्थित होतो.

### मद्यपी-चिलीम बहाद्दरांना कोणाचा धाकच नाही

सुपर मार्केटमध्ये दिवस-रात्र दारू ढोसणारे आणि गांजा फुकणारे बिनधास्त वावरत आहेत. येथील दुकानदारांनी अनेक वेळा पोलिसांना याबद्दल कल्पना दिली मात्र पोलिसांकडून ठोस कारवाई होत नसल्याचे सांगण्यात आले. कधी तर पोलीस फिरकतात. दारुड आणि गांजाखास यांना शिव्या हासडून निघून जातात. पण संबंधितांवर कारवाई केली जात आहे. त्यातून त्यांना कोणाचाच कसलाच धाक उरला नाही.

### ‘यांच्या’ वर्तनाचा विद्यार्थ्यांवर परिणाम

तीन महाविद्यालयाच्या मध्य भागात सुपर मार्केट असून रोज हजारो विद्यार्थी तेथून ये-जा करीत असतात. सकाळच्या वेळी हात हातभट्टी विक्रेता सुपर मार्केटमध्ये विकत बसलेला असतो. मद्यपी-चिलीम बहाद्दरही मज्ञा घेत बसलेले असतात. हे चित्र रोज विद्यार्थ्यांना पाहिला मिळतं याचा परिणाम विद्यार्थ्यावर होणार नाही का? असा प्रश्न स्थानिक करत आहेत.




### सुपर मार्केटला ‘यांच्या’मुळे अवकळा

सुपर मार्केटची प्रसिद्ध भाजी मार्केट म्हणून ओळख झाली होती. सर्व भाजीपाला, घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी असे दुकाने येथे होती. मात्र रोज मद्यपी-चिलीम बहाद्दरांकडून महिलांची छेड काढली जावू लागली. भाजी खरेदीसाठी आलेल्या महिलांमध्ये मद्यपींबद्दल भिती निर्माण झाली. त्यातून महिलांनी या मार्केटमध्ये भाजी खरेदीला येण्याकडे पाठ फिरवली. त्यातून सुपर मार्केटमधील भाजीपाल्याची खरेदी-विक्री मंदावली. पुढे पुढे थोडी दुकाने बंद होत गेली. मद्यपी अन् चिलीम बहाद्दरांमुळे व्यवसायावर परिणाम होत गेला आणि सध्या ही होत आहे, असे या परिसरातील नागरिकांचे म्हणणे आहे.

**समझने वालों को इशारा बस्स काफी है !**

## महास्वामींच्या हस्ते गळ्यात हार; देशमुख-मानेंच्या कानात गुजगोष्टी



सोलापूर/प्रतिनिधी

दक्षिण आणि उत्तर सोलापूर तालुक्याच्या राजकारणाचे केंद्र असलेल्या सोलापूर बाजार समितीच्या निवडणुकीच्या हालचाली वाढत आहेत. याच टप्प्यावर आज समितीच्या आवारात व्यापारी भवनाचा अनावरण समारंभ झाला. या निमित्ताने काही गोष्टी घडल्या. वास्तविक घडल्या की घडवल्या गेल्या. पण घडल्या. कार्यक्रमासाठी कर्नाटकमधून ज्या मल्लिकार्जून महास्वामींना पाचारण करण्यात आले होते. त्यांनी आमदार तथा बाजार समितीचे सभापती विजयकुमार देशमुख आणि माजी आमदार तथा समितीचे माजी सभापती दिलीप माने यांना एकत्रीत हारात गुंफले शिवाय कार्यक्रमादरम्यान माने आणि देशमुख हे एकमेकांच्या कानात गुजगोष्टी करीत होते यावरुन समितीवर पुन्हा देशमुख-माने यांचेच वर्चस्व राहणार का? माने आणि देशमुख हेच बाजार समितीचे कारभारी राहतील का? याबाबत चर्चा रंगली आहे. ‘समजझे वालों को इशारा काफी है’ असंही आज शनिवारी कार्यक्रमादरम्यान जे घडलं त्याबाबतीत म्हटलं जात आहे.

### भविष्यातील कानामधील गुजगोष्टी

बाजार समितीमध्ये आज झालेल्या कार्यक्रमादरम्यान विजयकुमार देशमुख आणि दिलीप माने यांच्यामध्ये कानगोष्टी बराच सुरु होत्या. दरम्यान हे दोघे नेमक्या कोणत्या प्रकरणावर कानगोष्टी करीत असतील याचा अंदाज त्यांच्या शेजारी बसलेल्या उपसभापती श्रीशैल नरोळे यांनादेखील आला नाही. तथापि, या कानगोष्टींचं रहस्य होऊ घातलेल्या बाजार समितीच्या निवडणुकीत कळू शकेल.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये व्यापारी भवनाच्या अनावरण कार्यक्रमासाठी मल्लिकार्जुन महास्वामींना बोलावण्यात आले होते. स्वामींचा आशीर्वाद घेण्यासाठी हजारो भक्त कर्नाटक मध्ये जातात. मात्र या ठिकाणी महाराजांनी स्वतःच्या हाताने दोघांच्याही गळ्यात एकच हार घातला. भविष्यात होणाऱ्या बाजार समितीच्या निवडणुकीत माने- देशमुख पॅटर्न राबून पुन्हा सत्तेत येणार अशीच चर्चा यादरम्यान बाजार समितीच्या आवरात होऊ लागली.‘भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे’ हा आशीर्वाद स्वामींनी दिला आहे, असावा अशी चर्चा रंगली होती.

माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदेंचा ‘हात’ आता कोणाच्या खांद्यावर असणार हे पुढील निवडणूकाच ठरविणार आहेत. काँग्रेसचा ‘हात’ पुन्हा ‘पॉवर’फुल्ल करण्यासाठी उत्तरच्या दिशेने दक्षिणची वारी करणार असे बोलले जात आहे.दरम्यान माजी सभापती तथा संचालक दिलिप माने यांनी सभापती विजयकुमार देशमुख यांच्या कानात भविष्यातील चर्चा करताना उपसभापती श्रीशैल नरोळे मात्र सभापतीच्या उजव्या बाजूला होते ते बहुतेक मी पुन्हा आपल्या सोबतच येईन असे तर म्हणत नसतील ना, असा कयास काढण्यात आला. बाजार समितीची निवडणूक लागणार की प्रशासक येणार याबद्दलचे औत्सुक्य असतानाच उपसभापतींच्या दालनात फक्त श्रीशैल नरोळे, सदस्य अमर पाटील होते. दोघांमध्येही गुप्त चर्चा झाली असल्याचे बोलले जात आहे. लोकसभेनंतर भविष्यात येणाऱ्या पहिली निवडणूक सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचीच असणार का या दृष्टीने पुढील सर्व तयारी केली तर जात नाहीना असाही अंदाज बांधण्यात आला.

**डीसीसी बँक : बेकायदेशीर कर्ज वाटप प्रकरण**

## चौकशीच्या उलट तपासणीला ‘तारीख पे तारीख’

**प्रादेशिक उपायुक्त टीकोळे २५ जुलैला चौकशीच्या फेऱ्यात**

सोलापूर/प्रतिनिधी

शेतकऱ्यांची बँक समजल्या जाणाऱ्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी अर्थात डीसीसी बँकेच्या कारभारातील अनियमिततेप्रकरणी प्रादेशिक उपायुक्त चंद्रकांत टीकोळे यांनी कलम २३ अंतर्गत चौकशी केली असून १३ जुलै रोजी सुनावणी होणार होती पण न्यायिक समितीला योग्य माहिती न मिळाल्याने टीकोळे यांची उलट तपासणी २५ जुलै रोजी होणार असल्याचे प्रशासनाच्यावतीने सांगण्यात आले आहे.

जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या चौकशीला पुन्हा तिसऱ्यावेळी सहा महिन्यांची मुदतवाढ मिळाली. या प्रकरणाची चौकशी १३ जुलै २४ रोजी होणार असल्याचे प्रशासन विभाग सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रशासन विभागाच्या वतीने सांगण्यात आले होते. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेने बिगर शेतीसाठी केलेले कर्ज वाटप बहुतांशी संचालक मंडळाच्या संस्थांना दिले आहे. हे कर्ज वाटप अतिशय चुकीच्या पद्धतीने झाले असल्याचे चौकशीत हे स्पष्ट झाले आहे.



सहकार कायदा कलम ८३ अन्वये केलेल्या चौकशीत तत्कालीन संचालक मंडळाला जबाबदार धरण्यात आले आहे. सदरच्या प्रकरणात दोषी धरण्यात आलेल्या संचालक मंडळाच्या चौकशी पूर्ण न झाल्याने सहा महिन्यांची पुन्हा मुदत वाढ दिली आहे. प्रादेशिक उपायुक्त चंद्रकांत टीकुळे यांनी सोलापूर डीसीसी बँकेचा ८३ अन्वये चौकशी अहवाल फेब्रुवारी २०२३ मध्ये विभागीय सहनिबंधक पुणे यांना सादर केला. त्यावर १८ एप्रिल २०२३ रोजी ८८ अन्वये चौकशीसाठी किशोर तोष्णीवाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ४६ संचालक व २१ कर्मचाऱ्यांना जिल्हा मध्यवर्ती बँक बेकायदेशीर ११०४ कोटी कर्ज वाटपाला जबाबदार धरण्यात आले आहे.

डीसीसी बँकेने विशेष वकील म्हणून भूषण वाळिंबे यांची नियुक्ती केली आहे. बँकेच्या आरोप पत्रावर ॲड. वाळिंबे व संचालक मंडळाच्या वकिलांमध्ये चौकशी अधिकारी किशोर तोष्णीवाल यांच्यासमोर युक्तिवाद होणार होता. आता चौकशी अधिकारी टीकोळे यांची २५ जुलै पासून उलट तपासणी होणार आहे. ॲड. अभिजित कुलकर्णी, ॲड. प्रकाशराव पाटील, ॲड. लेंडवे, सहायक ॲड. बुरंगे पुन्हा उलट तपासणी करतील असे प्रशासनाच्या वतीने श्री डांगे यांनी महिती दिली आहे.

## पालखीचे दर्शन घेताना ८० हजारांची लॉकेट पळवली

**अकलूज :** संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे दर्शन घेत असताना गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने एका तरुणाच्या गळ्यातील ८० हजार रुपये किमतीचे सोन्याची लॉकेट पळवली. हे चोरी अकलूज येथील गांधी चौकात शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडली. यासंदर्भात बाळासाहेब सदाशिव वागाव (रा.माढा) त्यांनी अकलूज पोलिसात फिर्याद दाखल केली. ते काल सकाळी नऊ वाजेच्या सुमारास गांधी चौक येथे पालखीचे दर्शन घेण्यासाठी गर्दीत गेले होते. दर्शन घेऊन ते बाहेर आल्यानंतर त्यांना गळ्यातील १५ ग्रॅम वजनाची चैन गायब झाल्याचे दिसून आले. त्यानंतर त्यांनी पोलिसात तक्रार दाखल केली.

# प्रवाशांनो; रेल्वे प्रवासासाठी ‘हा’ नियम लागू झालाय माहिती करुन घ्या, अन्यथा टीसी उतरवेल गाडीतून !

- प्रवासाचा मधल्यामध्येच होईल लोच्या
- चार चौघांसमोर इज्जतीचा होईल ‘फालुदा’
- मानसिक त्रास सहन करावा लागणं ते पुन्हा वेगळंच

सोलापूर/प्रतिनिधी



**माहितीचा खजिना सुराज्य InforMative**

नागरिकहो, विविध कारणांसाठी परगावी जाताना तुम्ही रेल्वेच्या सुरक्षित प्रवासाचा पर्याय निवडता. त्यासाठी रेल्वेचं तिकिट आरक्षित करण्यासाठीची तुमची धडपड असते. कैकजण तिकिटांचं बुकिंग ऑनलाईन पद्धतीनं करतात. पण तिटिकासंबंधी रेल्वे प्रशासनानं १ जुलैपासून नवा नियम अंमलात आणला आहे. या नव्या नियमाचा अवलंब नाही केल्यास आपणास फटका बसू शकतो. जो नियम इंग्रज काळापासून आहे, मात्र त्याची अमंलबजावणी होत नव्हती.

रेल्वे प्रवासासंबंधीचा हा नियम तुम्ही डावल्यास तुम्हाला टीटी दंड तर आकारतोच पण तुम्हाला गाडीतून तो खालीदेखील उतरवू शकतो. त्यातून तुमच्या प्रवासाचा मधल्यामध्येच लोचा होईल.गाडीतून बिस्तारा उचलायला लावून खाली उतरवल्यास गाडीतील चार चौघांसमोर तुमच्या इज्जतीचा फालुदा होईल. शिवाय मानसिक त्रास सहन करावा लागणं ते पुन्हा वेगळंच. त्यासाठी रेल्वे प्रशासनानं वेटिंग तिकिटासंबंधीचा जो नियम अंमलात आणला आहे. तो तुम्ही पाळा. तो पाळणं तुमच्या हिताचं होईल. दैनिक ‘सुराज्य’नं आपल्या वाचकांसाठी या नियमाचा घेतलेला हा धांडोळा...

भारतीय रेल्वेतून रोज कोट्यवधी प्रवाशी प्रवास करतात. परंतु प्रवास करताना हजारो जणांचे तिकिट कन्फर्म होत नाही. ऑनलाईन केलेले तिकिट प्रतिक्षा यादीवर असल्यास रद्द होते. परंतु, काऊंटरवर काढलेले तिकिट रद्द होत नाही. यामुळे अनेक जण वेटींग तिकिटावर रेल्वेतून प्रवास करतात. आता वेटींग तिकिटावर रेल्वेतून प्रवास करण्यासंदर्भात १ जुलैपासून मोठे बदल करण्यात आले आहे. वेटींग तिकिटावर रेल्वे प्रवास केल्यास दंड लागणार आहे. तसेच टीटी रेल्वेतून खाली उतरणार आहे. रेल्वेचा हा नियम इंग्रजांच्या काळापासून आहे. मात्र, त्याची अंमलबजावणी आता कठोरपणे सुरु झाली आहे.

रेल्वेने आरक्षित डब्यातून वेटींग तिकिटावर प्रवास करण्यास पूर्णपणे निर्बंध आणले आहे. म्हणजेच तुमचे वेटींग तिकिट असल्यास एसी किंवा स्लीपर कोचमधून तुम्ही प्रवास करु शकत नाही. १ जुलै पासून या निर्णयाचा अंमलबजावणी सुरु आहे. जुलै महिन्यापूर्वी वेटींग तिकिटावर प्रवास करणारे प्रवाशी प्रवास करु शकत होते. परंतु नियमाची अंमलबजावणी सुरु झाल्यामुळे त्याचा परिणाम वेटींगवर प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांवर सुरु झाला आहे.

### नियम इंग्रजांच्या आमदानीमधील जुनाच पण, १ जुलैपासून नव्यानं अंमलबजावणी

रेल्वेत प्रतिक्षा यादीवर असताना प्रवास करण्यास प्रतिबंध करणारा नियम इंग्रजांच्या काळापासून असल्याचे रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. परंतु या नियमाचे पालन होत नव्हते. आता रेल्वेने या नियमाचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. यामुळे ऑफलाईन तिकीट काढले असले तरी ते रद्द करुन पैसे परत घ्यावे, असे रेल्वेकडून सांगण्यात आले आहे.

### नियम भंग केल्यास खिशाला ‘एवढी’ लागणार कात्री

रेल्वेने आपल्या आदेशात म्हटले आहे की, वेटींग तिकिटावर आरक्षित डब्यातून प्रवास केल्यास ४४० रुपये दंड लागणार आहे. दंड भरुन प्रवाशांची सुटका होणार नाही. त्यांना त्या आरक्षित डब्यातून प्रवास करता येणार नाही. टीटी दंड वसूल केल्यानंतर वेटींगवर असणाऱ्या प्रवाशांना त्या डब्यातून खाली उतरवणार आहे. त्या प्रवाशांना जनरल कोचमध्ये पाठवण्याचा अधिकार टीटीकडे असणार आहे. रेल्वेने हा आदेश पाच हजार प्रवाशांची आलेल्या तक्रारीनंतर केला आहे.




# प्रा. लक्ष्मण हाके यांचे जल्लोषात स्वागत



पिलीव : ओबीसी आरक्षणाचे प्रा. लक्ष्मण हाके यांचे पिलीव येथे स्वागत करताना.

**पिलीव/प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्रात ओबीसींच्या न्याय व हक्कासाठी उपोषण व तीव्र आंदोलनाची धग पेटवून ओबीसी समाजाला जागृत करणारे प्रा. लक्ष्मण हाके हे उपोषणानंतर पहिल्यांदाच पिलीव येथे आले होते.

यावेळी पिलीव परिसरातील ओबीसी समाज बांधवांनी त्यांचे ढोल-ताशाच्या व फटाक्यांच्या आतिषबाजीत जल्लोषात स्वागत केले. प्रथम त्यांनी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. यानंतर ओबीसी समाज बांधवांच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी झिंजेवस्तीचे माजी सरपंच विठ्ठलराव मदने पाटील, शिवप्रसाद पुकळे, श्यामतात्या मदने, अमोल मदने, भजनदास चोरमले, राहुल मदने, जितेंद्र पाटील, तुषार लवटे, राहुल जावळे, आबा बनसोडे, शहाजी लेंगरे, श्याम शेंडगे, लहू पाटील, श्यामराव गलांडे, नानासो मदने, दादासाहेब वगरे, संतोष पडळकर, केशव वाघमारे, संजय पाटील, लक्ष्मण पवार, विठ्ठल मदने, मधुकर लेंगरे, नबाजी मदने, अशोक राजगे, अंकुश लेंगरे, सदाशिव मदने, नितीन कपने, शंकर शिंदे, राहुल लोखंडे, सुभाष जाधव, सचिन पुकळे, भिवातात्या घुले, खंडू माने यांच्यासह पिलीव परिसरातील ओबीसी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यापुढे आम्ही ओबीसी बांधव ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी तुमच्या पाठीमागे ठाम उभा राहणार असल्याचे आश्वासन यावेळी पिलीव येथील समाजबांधवांनी प्रा. लक्ष्मण हाके यांना दिले.

# व्यसनी तरुणांची करमाळा बसस्थानकात दहशत

## दिव्यांग आणि वृद्ध व्यक्तीस बेल्टने अमानुष मारहाण

**करमाळा/प्रतिनिधी**

**रात्रीच्या वेळी काही व्यसनी तरुण नशा करून धिंगाणा घालत करमाळा बसस्थानकावर अडकलेल्या प्रवाशांना त्रास देत असल्याचा प्रकार शुक्रवार रात्री साडेदहाच्या सुमारास निदर्शनास आला. या आणि अशा अनेक समस्यांच्या गर्तेत सापडलेल्या प्रवाशांना करमाळा आगाराकडून सहकार्याची अपेक्षा नसली तरी निदान पोलिसांनी तरी याबाबत दखल घेऊन या व्यसनी तरुणांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी रात्रीच्या वेळी ही घटना पाहणाऱ्या प्रत्यक्षदर्शींनी केली आहे.**

--------------------

शुक्रवारी रात्री साडेदहाच्या सुमारास बसस्थानकातून ओरडण्याचा आवाज येत असल्याने बस स्थानकाबाहेर असलेले काही रिक्षा चालक आणि जेवणानंतर शतपावलीसाठी आलेल्या काही तरुणांनी हा प्रकार काय आहे हे पाहण्यासाठी बसस्थानकात धाव घेतली. त्यावेळी एक तरुण बसस्थानकावर बस चुकल्यामुळे अडकलेल्या काही प्रवाशांना आणि निराधार असल्याने बसस्थानकाचा आश्रय घेत झोपलेल्या काही वृद्धांना त्रास देत असल्याचे दिसून आले.

### पोलिसांनी दखल घेण्याची मागणी

सुरुवातीला या तरुणाने परंडा येथे जाणारी बस चुकल्याने बसस्थानकावर थांबलेल्या एका दिव्यांग व्यक्तीच्या कुबड्या हिसकावून त्याची थट्टा करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या कृत्याला विरोध केल्यामुळे सदर व्यसनी तरुणाने कमरेच्या बेल्टने त्याला मारहाण केली. यानंतर आजूबाजूच्या फलाटावरील झोपेत असलेल्या वृद्धांच्या अंगावरील घोंगड्या ओढत त्यांना जागे करून त्यांनाही बेल्टने मारहाण केली.

दरम्यान हा गोंधळ पाहून जमा झालेल्या तरुणांना पाहून या विष्णू तरुणाने आपल्या साथीदारांसह बसस्थानकावरून पळ काढला. या मारहाणीत निराधार असल्यामुळे बसस्थानकावर झोपत असलेल्या वृद्ध व्यक्तीने कमरेवर बेल्टचा जोराचा फटका बसल्याचे तसेच दररोजच हा तरुण असा त्रास देत असल्याचे सांगितले.



अशाप्रकारे मद्यपान आणि अंमली पदार्थांचे सेवन करून रात्रीच्या वेळी बसस्थानकावर थांबलेल्या प्रवाशांना अमानुष मारहाण करून दहशत निर्माण करणाऱ्या व्यसनी टोळक्याचा बंदोबस्त करण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.

# आषाढी दर्शन रांगेत घुसखोरी करणाऱ्यांवर कारवाई

**पंढरपूर/प्रतिनिधी**

आषाढी शुद्ध एकादशी सोहळा १७ जुलै २०२४ रोजी होणार असून, आषाढी यात्रा सोहळयाचा कालावधी ६ ते २१ जुलै २०२४ आहे. या यात्रा सोहळ्याच्या कालावधीत लाखो भाविक श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरला येतात. दर्शन रांगेत घुसखोरीमुळे अनुचित प्रकार घडून चेंगराचेंगरी अथवा अन्य कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी दर्शनरांगेत घुसखोरीस प्रतिबंधासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) अन्वये उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी आदेश पारीत केले आहेत.

आषाढी यात्रा सोहळा कालावधीत लाखो भाविक विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरला येतात. यावेळी दर्शनासाठी अनेक तास भाविक दर्शनरांगेत उभे असतात आणि भाविकांना दर्शन सुकररित्या होण्याकरिता दर्शनरांगेचे व्यवस्थापन होणे आवश्यक असून काही इसमामार्फत दर्शनरांगेत घुसखोरी होत असल्याबाबत प्रसारमाध्यमांतून व भाविकांच्या तक्रारीतून निदर्शनास येत आहेत. या घुसखोरीमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक आदेश पारीत करण्यात आले आहेत. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३चे कलम १६३ (२) अन्वये अधिकार प्राप्त आहेत. या आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधित इसम कायदेशीर कारवाईस पात्र राहील, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## गौरी-गणपती उत्सवानिमित्त

# शिधापत्रिकाधारकांना मिळणार आनंदाचा शिधा : आ. पाटील

**सांगोला/प्रतिनिधी**

सणासुदीच्या काळात राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारकांना सवलतीच्या दरात गौरी-गणपती उत्सवानिमित्त आनंदाचा शिधा देण्यात येणार आहे. यामुळे राज्यातील नागरिकांचा गणेशोत्सव गोड होणार आहे. गौरी-गणपती उत्सवानिमित्त प्रत्येकी एक किलो रवा, १ किलो चनाडाळ, १ किलो साखर व १ लिटर सोयाबीन तेल असा आनंदाचा शिधा शंभर रुपयात देणार असल्याची माहिती शिवसेनेचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली.

राज्यातील १ कोटी ७० लाख ८२ हजार ०८६ शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा देण्यात येणार असून यासाठी ५६२ कोटी ५१ लाख रुपयांच्या खर्चास शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली असल्याचे आ. शहाजीबापू पाटील यांनी सांगितले

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या नेतृत्वाखाली जनतेच्या हिताचे निर्णय घेणाऱ्या महायुती सरकारने दिवाळी, गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, गौरी-गणपती उत्सव, श्री राम प्राणप्रतिष्ठा सोहळा,




छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त शिधापत्रिका १०० रुपयात आनंदाचा शिधा देण्यात आला होता. सदर उपक्रमास राज्यात उत्तम प्रतिसाद लाभल्याने त्याच धर्तीवर यंदा गौरी-गणपती उत्सवानिमित्त प्रत्येकी १ किलो रवा, १ किलो चनाडाळ, १ किलो साखर व १ लिटर सोयाबीन तेल या शिधाजिन्नसांचा समावेश असलेला आनंदाचा शिधा शंभर रुपयात शिधापत्रिकाधारकांना देण्यात येणार आहे.

राज्यातील १ कोटी ७० लाख ८२ हजार ०८६ शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा मिळणार आहे. याबाबत राज्य सरकारकडून शासनादेश प्रसिद्ध करण्यात आला आहे. आनंदाचा शिधा वाटपासाठी निविदा प्रक्रिया २१ ऐवजी आठ दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी सरकारकडून आनंदाचा शिधा निविदा प्रक्रिया आणि ५६२ कोटी ५१ लाख रुपयांच्या खर्चास जीआरद्वारे मान्यता देण्यात आली आहे.

सणासुदीच्या काळात गौरी-गणपती उत्सवानिमित्त शिधापत्रिकाधारकांना शंभर रुपयात आनंदाचा शिधा देण्यात येणार असल्याने गणेशोत्सव गोड होणार असल्याची माहिती शिवसेनेचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली.



पिलीव : ओंकार कारखाना परिवाराच्यावतीने वारकऱ्यांचे आदरातिथ्य करताना संचालिका रेखा बोत्रे-पाटील व इतर मान्यवर.

# ओंकार कारखान्याच्यावतीने दिंडीतील वारकऱ्यांचा सन्मान

**पिलीव/प्रतिनिधी**

माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील ओंकार साखर कारखान्याच्यावतीने संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे आगमन झाल्यावर बोधले महाराज व वसंतराव नागदे यांच्या दिंड्यातील वारकऱ्यांचे ओंकार कारखान्याच्यावतीने संचालिका रेखा बोत्रे-पाटील यांनी वारकऱ्यांचे स्वागत केले.

तसेच वारकऱ्यांना अन्नदानही करण्यात आले. यावेळी अन्नदानाची व वारकऱ्यांचा यथोचित सन्मान करण्याची प्रथा ओंकार साखर कारखान्याने चालू ठेवल्याबद्दल वारकऱ्यांच्यावतीने चेअरमन बाबूराव बोत्रे-पाटील व सर्व संचालक व ओंकार परिवाराचे आभार मानले. कार्यक्रमास जनरल मॅनेजर भिमराव वाघमोडे, केन अधिकारी शरद देवकर, डॉ. गौरी बोत्रे पाटील उपस्थित होते.

# अक्कलकोटमध्ये आषाढी एकादशी उत्सव

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

शहर ए वन चौक येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या अधिपत्याखाली असलेल्या श्री उपलप विठ्ठल मंदिर येथे बुधवार दि. १७ जुलै रोजी सालाबादाप्रमाणे आषाढी एकादशी वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानकडून साजरी करण्यात येणार असल्याची माहिती वटवृक्ष मंदिर व विठ्ठल मंदिर व्यवस्थापन समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी दिली.

एकादशीच्या दिवशी पहाटे ५ वाजता महाअभिषेक, महापूजा होईल. तदनंतर विठ्ठल मंदिर भाविकांच्या दर्शनाकरिता दिवसभर खुले करण्यात येईल. सकाळी ७ ते ९ या वेळेत

### उपलप विठ्ठल मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

लातूर जिल्ह्यातील चिकुर्डा येथील श्री दत्त भजनी मंडळ, वडगांव (ता. तुळजापूर) येथील संत तुकाराम महाराज भजनी मंडळ इत्यादी भजनी मंडळांची भजन सेवा श्रींच्या चरणी रुजू होईल, तसेच सकाळी ९ ते ११ या वेळेत आळंदी देवाची येथील कीर्तनकार ह.भ.प. विजय महाराज पांचाळ यांची कीर्तनसेवा श्री विठ्ठल मंदिर पटांगणात सादर होणार आहे.

महापूजेनंतर सकाळी ८ वाजता सर्व भाविकांना श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानतर्फे उपवासाचे शाबूदाणा खिचडी, केळी, चहा इत्यादी फराळ प्रसादाचे वाटप करण्यात येणार आहेतरी भाविकांनी दर्शन, भजन, कीर्तन, व प्रसाद सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन चेअरमन महेश इंगळे यांनी केले आहे.



# अन्नछत्र मंडळाचे नाव सर्वदूर पोहचले : ना. मंगलप्रभात लोढा

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून स्वामी भक्तांना विशेष सेवा भाव मिळत असल्यानेच आज मंडळाचे नाव सर्वदूर पोहचले असल्याचे मनोगत राज्याचे कौशल्य विकासमंत्री ना. मंगलप्रभात लोढा यांचे विशेष कार्य अधिकारी पंकज पाठक यांनी व्यक्त केले.

ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सह परिवार आले असता न्यासाचे पुरोहित संजय कुलकर्णी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. त्यांच्यासमवेत राजाभाऊ झिंगाडे हे उपस्थित होते.

यावेळी न्यासाचे गोटू माने, निखील पाटील, प्रवीण घाडगे, नामा भोसले, कल्याण देशमुख, सतीश महिंद्रकर, एस. के. स्वामी, सिद्धाराम कल्याणी, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, गोविंदराव शिंदे, चंद्रकांत हिबारे, राजू पवार, प्रसाद हुल्ले, विठ्ठलराव रेड्डी यांच्यासह मंदिरातील सेवेकरी, कर्मचारी, भाविक व भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.


जाहिर निविदा प्रसिध्दीकरण

**करमाळा नगरपरिषद, करमाळा, जि. सोलापूर**

**जाहिर निविदा प्रसिध्दीकरण सूचना**

करमाळा नगरपरिषदेकडील बांधकाम विभागासाठी कामांसाठी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी **अ. क्र. १ ते ३ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्था योजना अंतर्गत व ४ ते ६ नागरी दलित्तेतर वस्ती सुधारणा योजना अंतर्गत** करावयाच्या खालील कामांसाठी जाहिर निविदा अनुभवी ठेकेदारांकडून तांत्रिक ब-१ च्या नमुन्यात स्पर्धात्मक मागवित आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | कोरी निविदा किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | किल्ला विभाग येथील मारुती मंदिर परिसर कॉंक्रीटीकरण करणे. | ९९६८७४.०० | १००००/- | १०००/- |
| २ | घोलप नगर येथील सह्याद्री प्लाझा कोपरा ते बी.के. कांबळे घर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ९२३००२.०० | १००००/- | १०००/- |
| ३ | महेंद्र नगर येथील दळवी घर ते क्षिरसागर घर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ९९८४४१.०० | १००००/- | १०००/- |
| ४ | महेंद्र नगर येथील मलिकपेठकर घर ते निलाखे घर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ९९६०२९.०० | १००००/- | १०००/- |
| ५ | घोलप नगर येथील पवार सर घर ते पाटील सर घर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ९८४५५१.०० | १००००/- | १०००/- |
| ६ | नवरत्न कॉलनी येथील रांजणकर घर ते खलील शेख घर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ९९७५०२.०० | १००००/- | १०००/- |

१. जाहिर निविदा फॉर्म न.पा. कार्यालयात दि.१५/०७/२०२४ पासून ते दि. २२/०७/२०२४ सायं. ४.०० वाजेपर्यंत विक्रीसाठी उपलब्ध आहेत.
२. जाहिर निविदा फॉर्म स्वीकृती दि.१५/०७/२०२४ पासून ते दि. २३/०७/२०२४ सायं. ४.०० वाजेपर्यंत राहिल.
३. जाहिर निविदा उघडण्याचा दि. २३/०७/२०२४ रोजी सायं. ४.०० वा. (शक्य झाल्यास).
४. सर्व पात्र/इच्छुक निविदाधारकांसाठी निविदा फॉर्म न.पा.च्या कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपलब्ध आहेत.

**शर्ती व अटी :-**

१. कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नामंजूर करणेचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखुन ठेवला आहे.
२. निविदा धारकांनी निविदा फॉर्म लिफाफे दि. २३/०७/२०२४ रोजी दु. ४.०० वाजेपर्यंत करमाळा नगरपरिषद कार्यालयात जमा करावयाची आहेत.
३. कोणत्याही बाबीसाठी काही तंटा निर्माण झाल्यास याबाबत नगरपरिषदेचा निर्णय अंतिम राहिल.

**सही/-**
**श्री. आकाश वाघमारे**
**बांधकाम अभियंता**
**करमाळा नगरपरिषद**

**सही/-**
**श्री. सचिन तपसे**
**मुख्याधिकारी**
**करमाळा नगरपरिषद**


# राष्ट्रीय लोक अदालतीचे २७ जुलैला आयोजन

**सोलापूर/प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशाप्रमाणे सन २०२४ या वर्षातील दुसरी राष्ट्रीय लोक अदालत दि. २७ जुलै २०२४ रोजी सोलापूर जिल्ह्यातील सर्व न्यायालयात आयोजित करण्यात आलेली आहे. या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त पक्षकारांनी आपापली प्रकरणे तडजोडीने मिटवून लोक अदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष मो. सलमान आझमी यांनी केले आहे.**

यावेळी लोक अदालतीमध्ये फौजदारी तडजोडपात्र प्रकरणे, बँक वसुली प्रकरणे, कलम १३८ एन. आय. ॲक्टची प्रकरणे, अपघात न्यायाधिकरणाबाबतची प्रकरणे, कामगार वाद प्रकरणे, वीज व पाणी यांच्या देयकाबाबतची प्रकरणे, वैवाहिक वादाबाबतची प्रकरणे, भूसंपादन बाबतची प्रकरणे तसेच बँक, सहकारी बँक, सहकारी पतसंस्था यांच्या वसुलीच्या दरखास्त, बँक लवाद दरखास्त इत्यादी (प्रलंबित व दाखलपूर्व) प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. ज्या पक्षकारांना लोकअदालतमध्ये प्रत्यक्षरीत्या सहभागी होता येणार नाही त्यांच्यासाठी आभासी पध्दतीने उपस्थित राहण्याकरिता ऑनलाइन माध्यमाचा वापर केला जाणार आहे.

### जास्तीत जास्त पक्षकांनी आपली प्रकरणे मिटवून घ्यावीत : न्या. मो. सलमान आझमी



लोकन्यायालयात ई-चलनाच्या प्रकरणात एसएमएसद्वारा वाहनधारकांच्या मोबाईलवर नोटीसा पाठविले जात आहेत. सदर चलनानुसार नोटीसमध्ये नमूद लिंकवर ऑनलाइनव्दारे चलनाची रक्कम भरता येऊ शकते. तसेच महा ट्राफिक या ॲपवरसुध्दा सदर रक्कम भरता येवू शकते. या व्यतिरिक्त महाराष्ट्रातील कोणत्याही जवळच्या वाहतूक शाखेमध्ये जाऊन सदर रक्कम भरता येऊ शकते. धनादेश न वटलेल्या फौजदारी प्रलंबित प्रकरणांमध्ये धनादेशाची थोडी रक्कम भरुन प्रकरण निकाली काढता येणे शक्य होणार आहे. धनादेशाची रक्कम एकरकमी देता येणे शक्य नसल्यास ठरलेल्या रकमेचे हप्ते बांधून घेणे शक्य होणार आहे. काही रक्कम लोकअदालती दिवशी देऊन उर्वरीत रकमेबाबत तडजोड हुकूमनामा करणे व संपूर्ण फौजदारी प्रकरण निकाली निघणे शक्य होणार आहे. परिणामी पक्षकारास न्यायालयात पुन्हा हजर राहण्याची आवश्यकता राहणार नाही.

### लोकन्यायालयाचे फायदे

प्रकरणाचा झटपट निकाल लागतो. तोंडी पुरावा उलट तपासणी, दिर्घ युक्तीवाद या बाबी टाळल्या जातात. लोकन्यायालयाच्या निवाड्याविरुद्ध अपील नाही. एकाच निर्णयात कोर्ट बाजीतून कायमची सुटका होते. लोकन्यायालयात होणारा निवाडा हा आपसात समझोतीने होत असल्याने ना कोणाचा जय होतो ना कोणाची हार. लोकन्यायालयाचा निवाडा दोन्ही पक्षांना समाधान देतो. परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकमेकांतील व्देष वाढत नाही व कटूताही निर्माण होत नाही. न्यायालयाच्या हुकूमनाम्याप्रमाणेच लोकन्यायालयात होणाऱ्या निवाड्याची अंमलबजावणी न्यायालयामार्फत करता येते. वेळ आणि पैसा दोघांचाही बचत होते. लोकन्यायालयात निकाली निघणाऱ्या प्रकरणात कायद्यानुसार कोर्ट फीची रक्कम परत मिळते.

# उमेदवारीच्या खेळात बापू कसे करणार कोणाला चेकमेट?

- घटलेलं मताधिक्य डोकेदुखी; अनेकांचं गुडघ्याला बाशिंग
- बहुजनांचा फटका टाळण्यासाठी बहुजन पसंतीचा युवा चेहरा निवडण्याचे वरिष्ठांचे संकेत

- दोघा इच्छुकांकडून जोरदार फिल्डिंग
- राजस्थानच्या फॉर्म्युल्यानुसार देऊ शकतात अनेक ज्येष्ठ नेत्यांना धक्का
- युवा चेहऱ्यांमध्ये नरेंद्र काळे, संतोष पवार या नेत्यांची चर्चा

दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी

**बहुर्चित सोलापूर दक्षिण विधानसभेच्या मतदार संघात भाजपची उमेदवारी कोणाला मिळणार? हा विषय सध्या सर्वात 'हॉट' आहे. या मतदार संघातून निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या अन्य चेहऱ्यांच्या तुलनेत आपणच कसे अधिक सक्षम आणि निवडून येण्यालायक आहोत, हे सिद्ध करण्याचे आव्हान विद्यमान आमदार सुभाष देशमुख यांच्यापुढे आहे. शिवाय राजकारणाच्या डावामधील बुजूर्ग देशमुख हे उमेदवारीच्या पार्श्वभूमीवर अन्य इच्छुकांपैकी कोणाला कसे चेकमेट करतात? हे पाहणं अत्यंत महत्त्वाचं या मतदार संघासाठी आहे. लोकसभेला घटलेले मताधिक्य देशमुखांना विधानसभेसाठी डोकेदुखी ठरत आहे. या मतदार संघात अनेकजण इच्छुक आहेत, त्यापैकी कोणाला उमेदवारी पक्ष देणार? नव तरुणांना उमेदवारीत न्याय देण्याचा विचार झाल्यास विद्यमान आमदार सुभाष देशमुखांचे निवडणूक लढण्याचे काय होणार? हा मुद्दा अधोरेखीत ठरणारा आहे.**


सुभाष देशमुख


उदय शंकर


संतोष पवार


नरेंद्र काळे


श्रीशैल हत्तुरे

लोकसभेचा निकाल लागून महिना उलटून गेला तरी निकालाचे धक्के अनेकांना अजून बसतच आहेत. भाजपची दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातून झालेली पिछेहाट ही आमदार सुभाष देशमुख यांच्यासाठी विधानसभेला डोकेदुखी ठरणारी मानली जात आहे. वरिष्ठ नेता, दीर्घकाळ सत्तेचा अनुभव व अनेक वर्षे मंत्रिपद मिळवूनही आमदार देशमुख यांच्या नेतृत्वाखाली दक्षिण सोलापूर विधानसभेतील कार्यकर्त्यांनी लोकसभेकरिता काम केले. परंतु जनतेमध्ये त्यांच्याबद्दल असलेला रोष पाहता ते खूप काही मतदारसंघात फिरले नसल्याचे निदर्शनास आले. त्यात त्यांची 'लोकमंगल'ची यंत्रणा म्हणावी तशी सक्रिय देखील नव्हती अशी चर्चा आहे. याचाच फायदा घेत विरोधकांनी चोख यंत्रणा लावत दक्षिण सोलापुरातून मताधिक्य खेचून आणले. यात बहुतांश मताधिक्य हे मुस्लीम, बहुजन व बंजारा समाजाचा होते. सिद्धेश्वर कारखान्याचा फॅक्टर देखील येथे खूप चालला.

एकंदरीत सर्व बाजूंनी विचार करता भाजपची पिछेहाट झाली, हे मान्य करावे लागेल. मागील विधानसभा निवडणुकीत मिळालेला ३० हजारचा लीड मोडत १० हजाराची लीड येथे काँग्रेसने घेतला याचीच संधी साधत भाजपमधील अनेकांनी उमेदवारीसाठी डोके वर काढले. यात प्रामुख्याने श्रीशैल हत्तुरे, उदय पाटील, नरेंद्र काळे, अप्पासाहेब पाटील वडकबाळकर व संतोष पवार यांचे नाव पुढे येत आहे. श्रीशैल हत्तुरे, उदय पाटील, अप्पासाहेब पाटील वडकबाळकर हे प्रामुख्याने लिंगायत समाजातून येतात. त्यामुळे बहुजन व मुस्लीम मते यांच्याकडे किती प्रमाणात वळतील यात साशंकता आहे.

नरेंद्र काळे हे धनगर समाजाचे आहेत व मूळ संघटनेत त्यांनी अनेक वर्षांपासून काम केले आहे. परंतु आमदार सुभाष देशमुखांच्या मर्जीतले नसल्यामुळे व आमदार विजयकुमार देशमुख यांच्या अत्यंत जवळचे असल्याने त्यांच्या उमेदवारीसाठी आमदार सुभाष देशमुखांचा कितपत होकार त्यांना मिळेल, हा संशोधनाचा विषय आहे. संतोष पवार हे अनेक वर्षांपासून विधानसभेत सक्रिय आहेत व मागील निवडणुकीत वंचित सोबत असल्याने बहुजन समाजाचा युवा वर्ग मोठ्या प्रमाणात त्यांच्या पाठीशी आहे. ते बंजारा समाजातून येत असल्याने बंजारा समाजदेखील त्यांच्या पाठीशी एकमुखाने उभे राहील, असे चित्र आहे, तसा बोलबाला आहे. मुस्लीम समाजातील युवक देखील त्यांच्यासोबत असल्याचा त्यांचा दावा आहे. आमदार सुभाष देशमुख आणि आमदार विजयकुमार देशमुखांचा देखील फारसा विरोध होणार नाही असे चित्र त्यांच्याबाबतीत रंगवले जात आहे. मित्रपक्षात देखील त्यांच्याबद्दल अनुकूल वातावरण असल्याचा दावा केला जात आहे.

या सर्व घडामोडी मतदारसंघात घडत असताना आमदार सुभाष देशमुखांचे चिरंजीव रोहन देशमुख यांनी अचानकपणे तुळजापूर विधानसभेत आपले दौरे वाढवले आहेत. आता हे आमदार सुभाष देशमुखांचे दबावतंत्र आहे का वरिष्ठांच्या सूचना याचे उत्तर येणार काळच देईल. मात्र, देशमुखांच्या लोकमंगलच्या टीमने देखील गावोगावी लोकांशी संपर्क वाढवलेला दिसतो आहे. सुभाष देशमुख देखील मुरलेले राजकारणी असून बुद्धिबळाच्या पटलावर कोणाला कधी शह, टक्कर द्यायचे हे त्यांना चांगले ठाऊक आहे.

### उमदेवारीसंबधी नवा पॅटर्न राबवायचे झाल्यास बापूंचे काय?

मागील काही महिनांपूर्वी झालेल्या राजस्थान व मध्यप्रदेश निवडणुकीत भाजपने अनेक वरिष्ठांना घरी बसवत युवा वर्गाला संधी दिली होती. त्याचे चांगले परिणाम त्यांना मिळाले. त्याचीच पुनरावृत्ती ते महाराष्ट्रात करतील का? आणि बहुजन समाजाला आपलेसे करण्यासाठी बहुजनवादी चेहऱ्याला संधी देतील का? आमदार सुभाष देशमुख आपल्या अनुभवाने बुद्धिबळातील खेळात विजयी होतील का? अशा अनेक प्रश्नांचे उत्तर पुढील घडणाऱ्या राजकीय घडामोडींवर अवलंबून आहेत.



बार्शी : एमआयटीच्या डब्ल्यूपीयूच्या पहिल्या राष्ट्रीय वैज्ञानिक पत्रकार परिषदेत उपस्थित मान्यवर.

## एमआयटी डब्ल्यूपीयूतर्फे पहिली राष्ट्रीय वैज्ञानिक गोलमेज परिषद

देश-विदेशातील १३० शास्त्रज्ञांचा असणार सहभाग

बार्शी/प्रतिनिधी

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी तर्फे देशात प्रथमच विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित भारतीय शास्त्रज्ञांची तीन दिवसीय 'पहिली राष्ट्रीय वैज्ञानिक गोलमेज परिषद' विकसित भारत २०४७ आयोजित केली आहे.

शुक्रवार, दि. १९ ते रविवार, दि. २१ जुलै या कालावधीत ही परिषद एमआयटी डब्ल्यूपीयूमध्ये होणार आहे. अशी माहिती ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, पद्मभूषण डॉ. विजय भटकर, एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड आणि एनएसआरटीसीचे राष्ट्रीय संयोजक व एमआयटी डब्ल्यूपीयूचे प्र-कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

उद्घाटन शुक्रवारी (दि.१९) रोजी एमआयटी डब्ल्यूपीयूमध्ये सायं ४ ते ६ या कालावधीत होणार आहे. यावेळी केंद्रीय विज्ञान-तंत्रज्ञान मंत्रालय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंग हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. एन. कलई सेल्वी, डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. विजय भटकर, डॉ. शेखर मांडे, डॉ. गणपती यादव आणि प्रा.टी. प्रदीप हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. समारोप समारंभ रविवारी (दि.२१) सायंकाळी ४ ते ६ या कालावधीत हॉटेल टीप टॉपमध्ये होईल. परिषदेच्या अध्यक्षस्थानी एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील. एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्यकारी अध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांच्या संकल्पनेतून साकार होत आहे. परिषदेत आर्टीफिशियल इंटेलिजेन्स, ॲडव्हॉन्स मटेरियरिल्स ॲण्ड प्रोसेसिंग, ॲग्री टेक, बायोटेक्नॉलॉजी आदी विषयांवर चर्चा होणार आहे. डॉ. अशोक जोशी, डॉ. थल्लापाई प्रदिप, डॉ. एम.एस. रामचंद्रा राव, डॉ. रिचर्ड लोबो, प्रा.डॉ. अजित कुलकर्णी, डॉ. उमेश वाघमोरे, डॉ. दिपंकर दास शर्मा आदींसह भारतातून जवळपास १३० वेगवेगळ्या विषयातील शास्त्रज्ञ उपस्थित राहणार आहेत. १३० शास्त्रज्ञांच्या संशोधनाचे ॲबस्ट्रॅक बुक प्रकाशित येईल. परिषद युटूब, फेसबूक, इन्स्टाग्राम वर थेट प्रसारित केले जाईल.

पत्रकार परिषदेत एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ.आर.एम. चिटणीस, अमेरिकेतील शास्त्रज्ञ डॉ. अशोक जोशी, डॉ. संजय कामतेकर, डॉ. एम.एस. रामचंद्रा राव, डॉ. भारत काळे आणि डॉ. चवली मूर्ती उपस्थित होते.



## सेवानिवृत्त जवानांसाठी परिसंवाद मेळावा

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर जिल्हयातील नौदलातून सेवानिवृत्त झालेले सैनिक व त्यांच्या विधवांना कळविण्यात येते की, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांचे अधिपत्याखालील सैनिकी मुलांचे वसतीगृह, शासकिय औद्योगिक प्रशिक्षण केंद्राच्या पाठीमागे, विजापूर रोड, सोलापूर येथे दिनांक १३ जुलै २०२४ रोजी सकाळी ०९ वा. नौदलातील १२ अधिकारी व ४ सैनिकांची कार रॅली येणार आहे.

हे अधिकारी सोलापूर जिल्हयातील नौदलातून सेवानिवृत्त झालेल्या सैनिकांना व त्यांच्या विधवा यांचे सोबत संवाद साधणार आहेत. तरी या परिसंवाद मेळाव्यासाठी जिल्हयातील नौदलातून (छर्ीूं) सेवानिवृत्त झालेले सैनिक व त्यांच्या विधवांनी मोठ्या संख्येने वरील ठिकाणी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी निवृत्त ले. कर्नल शरद प्रकाश पांढरे यांनी केले आहे.

## 'हिरकणी' बंद असल्याने स्तनदा मातांची कुचंबना

- सेतू कक्षात ताटकळत बसण्याची अपुरी व्यवस्था

विकास चाटी/सोलापूर

नागरिकांना दाखले, प्रतिज्ञापत्र आदी कागदपत्रे देण्यासाठी राज्यशासनाच्यावतीने सेतू सुविधा सुरु करण्यात आली. मात्र सोलापुरातील सेतू केंद्रावर सुविधांचीच वानवा आहे. हिरकणी कक्ष बंद असल्याने कामानिमित्त आलेल्या स्तनदा मातांना आपल्या बाळाला पाजण्यासाठी आडोसा बघून बसावे लागत आहे.

गुरुवारी (दि. १२) सेतू केंद्रात गेले असता हा प्रकार दिसून आला. दाखले, प्रतिज्ञापत्र आदी कामांसाठी अनेक स्तनदा महिला त्यांच्या पती किंवा संबंधितांसह आल्या होत्या. त्यांची बालके अत्यंत लहान असल्याने त्यांना चिमुकल्या बालकांनाही आपल्या बरोबर आणावे लागले होते. अशा चिमुकल्यांना भुक लागल्यावर त्यांना दुध पाजण्यासाठी महिलांना हिरकणी कक्षाचा वापर करता आला नाही. हिरकणी कक्ष कुलूप लावून बंद केलेला दिसला. परिणामी अनेक स्नतदा मातांनी कोठेतरी कोपरा पाहून आपल्या बाळाची भुक शमवली. शासनाने स्तनदा मातांसाठी सरकारी कार्यालयांमध्ये, एसटी बस स्थानकात मोठा खर्च करत हिरकणी कक्ष निर्माण केले. मात्र ते चालू असतात का नुसते देखाव्यापुरतेच असतात? स्तनदा मातांना जेव्हा गरज असते तेव्हा त्या हिरकणी कक्षांचा त्यांना लाभ होतो का हे पाहण्याची जबाबदारी प्रशासन किंवा शासकिय यंत्रणेची नाही काय असा प्रश्न यानिमित्ताने निर्माण झाला आहे. सोलापूर एसटी बसस्थानकातील हिरकणी कक्षाची दारुण अवस्था दैनिक सुराज्यने वेळोवेळी मांडली आहे. आता सेतू केंद्रातील बंद हिरकणी कक्ष केवळ देखाव्यापुरताच असल्यासारखी स्थिती आहे.



सोलापूर : हिरकणी कक्ष बंद असल्याने कोपरा पाहून बाळाची भुक भागविणारी माता.


बाकड्यांवरील कडाप्पा गायब झाल्याने नागरिकांची तपश्चर्या. दुसऱ्या छायाचित्रात रांगेच्या कठड्यामध्ये वाढलेली झाडे.

### बाकड्यांवरील कडाप्पा गायब; नागरिकांची तपश्चर्या

हिरकणी कक्षाची अशी अवस्था तर सेतु इमारतीच्या आवारात कामानिमित्त आलेल्या नागरिकांना बसण्यासाठी केलेल्या बहुतांश बाकड्यांवरील कडाप्पा गायब झाले आहेत. परिणामी काही जण उभ्या फरशीवर बसत आहेत. तर अनेकांना संपुर्ण काम होईपर्यंत उभा राहून तपश्चर्या करावी लागत आहे.

### कठड्यांमध्ये झाडांची वाढ; वादाचे कारण

लोकांनी रांग तोडू नये म्हणून केलेल्या लोखंडी कठड्यात झाडे वाढली असून नागरिकांना त्या कठड्यांबाहेरुनच रांग करावी लागत आहे. परिणामी दोन रांगात नक्की कोण कोठे उभा राहिला, यावरुन भांडणे होत आहेत.

## सत्ता असो वा नसो बाजार समितीमधील व्यापारी भवनाचे काम पूर्णत्वास नेणार : देशमुख

- मार्केट यार्डात व्यापारी भवनाच्या कोनशिलेचे अनावरण
- जगद्गुरु डॉ मल्लिकार्जुन महास्वामी यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत मागील पाच सहा वर्षाच्या काळात समितीमधील सर्व घटकांना विश्वासात आणि सोबत घेऊन विकास कामे साधली आहेत. व्यापारी, शेतकरी, अडतदार आणि बाजार समिती प्रशासन यांचा समतोल साधला.दरम्यान व्यापाऱ्यांनी ठरवलेले व्यापारी भवन पूर्ण करण्यासाठी सत्तेत असो अथवा नसो ते पूर्ण करणार असे अभिवचन सभापती तथा आमदार विजयकुमार देशमुख यांनी दिले. व्यापारी भवनासाठी शासन स्तरावरुन जी काही मदत लागेल, ती देण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये व्यापारी भवनच्या कोनशीलेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या व्यापारी भवन कोनशिलेचचे पूजन श्री श्री श्री १००८ जगद्गुरु डॉ मल्लिकार्जुन विश्वारध्य शिवाचार्य महास्वामी,ज्ञानपीठ काशी यांच्या उपस्थितीत सभापती विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते तर माजी सभापती तथा दिलीप माने यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.



सोलापूर : येथील हैदराबाद रस्त्यावरच्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत उभारण्यात येणाऱ्या व्यापारी भवनाच्या कोनशिलेच्या अनावरणप्रसंगी मल्लिकार्जुन महास्वामी,सभापती विजयकुमार देशमुख, माजी सभापती दिलीप माने,इंदुमती अलगोंडा पाटील,अमर पाटील आदी.

यावेळी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती महादेव चाकोते,राज शेखर शिवदारे, इंदुमती अलगोंड-पाटील, उपसभापती श्रीशैल नरोळे, संचालक बाळासाहेब शेळके, वसंतपाटील, अमर पाटील, रामप्पा चिवडशेट्टी, अप्पासाहेब पाटील, राजकुमार वाघमारे, शिवानंद पुजारी, केदारनाथ उंबरजे, नामदेव गवळी, बसवराज इटकळे, सचिव दत्तात्रय सूर्यवंशी, कस्तुराबाई अडत व्यापारी संघाचे अध्यक्ष नानासाहेब देशमुख,राणी लक्ष्मीबाई अडत व्यापारी संघाचे अध्यक्ष रियाजभाई बागवान,फळ विक्रेते संघटनेचे अध्यक्ष फैयाज बागवान यांची प्रमुख उपस्थिती होती. सभापती देशमुख पुढे म्हणाले की, 'सबका साथ, सबका विकास' या योजनेचा फायदा शेतकरी, व्यापारी,कर्मचारी, अडते,हमाल तोलार यांना होणार आहे. यासोबत शेतकरी भवन, मिटिंग हॉल देखील नियोजित ठिकाणी करण्यात येणार आहे.

याप्रसंगी भुसार आडत व्यापारी संघाचे अध्यक्ष सुरेश चिखहळळी, दाळ मिल ओनर असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण भुतडा, ऑइल मिल असोसिएशनचे अध्यक्ष म्हालिंगप्पा परमशेट्टी,शेतकरी उपस्थित होते.

बाजार समितीशी संबंधित सर्वांना पसंद पडेल आणि सर्वांच्या फायद्याचे ठरणारे यापारी भवन लवकर पूर्ण करण्यासाठी बाजार समिती प्रशासनाने देखील कामाला लागावे.शासन स्तरावरील सर्व कामे वेळेत पूर्ण केल्यास देखणी इमारत लवकर पूर्णत्वास येईल. बाजार समितीशी संबंधित असणाऱ्यांसाठी व्यापारी भवन उभारले जात आहे, या गोष्टीचे समाधान आणि आनंद आहे.


**- दिलीप माने,**
माजी सभापती बाजार समिती

सोलापूर बाजार समिती नाव सुयोग्य नियोजनमुळे संपूर्ण महाराष्ट्रात पसरले आहे. यापुढेही समिती शेतकऱ्यांच्या विश्वासास पात्र राहील.बाजार समितीचे नाव देशात प्रसिद्ध होईल, असा मोठा विश्वास वाटतो.

**- बाळासाहेब शेळके,**
संचालक, बाजार समिती,

## आषाढी वारी दिवशीच एसटी कर्मचारी संपावर

सोलापूर/प्रतिनिधी



सेवाशक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघ महाराष्ट्र राज्याच्या वतीने एस. टी. कर्मचाऱ्यांना सेवाजेष्ठतेनुसार ७ वा वेतन आयोग, कॅशलेस मेडिकल सुविधा या मागणीसह प्रलंबित मागण्यासाठी आषाढी एकादशी दिवशी म्हणजेच १७ जुलै रोजी राज्य सरकारला जाग यावी याकरिता एकदिवसीय संप करण्यात येणार आहे.

एस.टी. कर्मचाऱ्यांना राज्य सरकारने नेहमीच दुय्यम वागणूक दिली असून सन २०२१ मध्ये एस.टी. कर्मचाऱ्यांच्या संपा दरम्यान तत्कालीन विधान परिषदेचे सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांच्या दालनात सर्वपक्षीय आमदार यांची बैठक होऊन संपावर तोडगा काढण्यासाठी एस. टी. कर्मचाऱ्यांच्या १६ मागण्या मान्य करूनही त्याची आजतागायत अंमलबजावणी झाली नाही. दरम्यान आमच्या संघटनेने राज्य सरकार व एस.टी. प्रशासनाशी वारंवार पत्रव्यवहार करूनही राज्य शासन आमच्या मागण्या मान्य करीत नसल्याने दिनांक २० डिसेंबर २०२२ पासून हिवाळी अधिवेशन नागपूर येथे बेमुदत आमरण उपोषणाचा इशारा दिल्यानंतर देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या दालनात बैठक घेऊन एका महिन्यात प्रश्न निकाली काढण्याचे आश्वासन देऊनही प्रश्न निकाली न निघाल्याने आमच्या संघटनेने दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी आत्मक्लेष आंदोलन केले असता

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या समवेत त्यांच्या दालनात बैठक आयोजित केली असूनही केवळ आश्वासनच देण्यात आले.

एस टी संघटनेचे सरचिटणीस मेटकरी यांनी सांगली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तब्बल ३५ दिवस आमरण उपोषण करण्यात आले.

# उजनीकाठची दळणवळण व्यवस्था मजबूत करण्याच्या दृष्टीने पूल उभारण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी करणार : बागल

करमाळा/प्रतिनिधी

**उजनी लाभक्षेत्रातील दळणवळण वळण व्यवस्था मजबूत करण्यासाठी गोयेगाव, पोमलवाडी, ढोकरी येथे उजनी जलाशयात पूल उभारणी करणे गरजेचे आहे. यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आग्रही मागणी करणार असल्याचे प्रतिपादन मकाई कारखान्याचे माजी चेअरमन दिग्विजय बागल यांनी वाशिंबे येथील कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना केले.**

करमाळा तालुक्यातील वाशिंबे येथे बागल गटाच्यावतीने राजाभाऊ जगदाळे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यकर्ता मेळावा पार पडला. मोरवड, केम, वांगी नं ३, वीट, वडगाव (उ), केतुर नं. २, वरकटणे येथील मेळाव्यांनंतर बागल गटाचा हा नववा मेळावा होता.

यावेळी बागल यांनी पुढे बोलताना सांगितले की, उजनी धरणात अनेक गावांना जलसमाधी मिळाली. हजारो एकर शेतजमीन पाण्यात गेली. यासाठी सर्वात मोठा त्याग येथील धरणग्रस्त शेतकऱ्यांनी केला. परंतु उजनी बॅकवॉटर परिसरातील गावांना हाकेच्या अंतरावर जाण्यासाठी ८० ते ९० किमीहून अधिक वळसा घालून प्रवास करावा लागतो. त्यामुळे वेळ आणि पैसा वाचवण्यासाठी होडीतून जीवघेणा प्रवास करावा लागतो. अशा धोकादायक प्रवासामुळे आत्तापर्यंत ४० हून अधिक जणांना जलसमाधी मिळाली आहे. पुनर्वसनानंतर या ठिकाणी दळणवळणासाठी पर्यायी मार्गाची व्यवस्था झाली नाही. त्यामुळे गोयेगाव, पोमलवाडी, ढोकरी या ठिकाणी पुल होण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे प्रतिपादन बागल यांनी यावेळी केले.



करमाळा : करमाळा तालुक्यातील वाशिंबे येथील कार्यकर्ता मेळाव्यात उपस्थित ग्रामस्थ.

या मेळाव्याला मकाई कारखान्याचे चेअरमन दिनेश भांडवलकर, ज्येष्ठ नेते व संचालक बाळासाहेब पांढरे, कल्याण शिंदे, प्रा.जाकीर शेख, विलास झोळ, जगदीश पवार, गणेश झोळ, शैलेश झोळ, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती चिंतामणी जगताप, मकाईचे संचालक सतीश नीळ, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक काशिनाथ काकडे, अजित झांझुर्णे, विलास काटे, रेवणनाथ निकत, विजय गोडगे, स्वप्नील गोडगे, बाळासाहेब सरडे, रणजित शिंदे, संतोष पाटील, साधना खरात यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्ता असो वा नसो बागल गटाने वाशिंबे गावासाठी विकास कामे केली. जेऊर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र वाशिंबे येथे स्थलांतरित करण्यास मंजुरी मिळाली असून पाच कोटीहून अधिक निधी उपलब्ध होणार आहे. या माध्यमातून एमबीबीएस व बीएएमएस डॉक्टरांकडून रुग्णांवर मोफत उपचार केले जाणार आहेत.

पंचायत समिती सभापती असताना स्व. दिगंबरराव बागल यांनी वाशिंबे येथे पशुवैद्यकीय दवाखाना मंजूर केला. तसेच शामल बागल यांच्या कार्यकाळात वाशिंबेत ३३/११ Kv सबस्टेशनला मंजुरी मिळून काम पूर्ण झाले. भैरवनाथ मंदिराला तिर्थक्षेत्र विकास आराखडा समावेश करुन क दर्जा देण्यात आला व मंदिर परिसरात सभागृह व पेव्हींग ब्लॉक बसविण्यात आले. गावातील मुख्य चौकातील समाज मंदिर ही बागल मामांनी केले. वाशिंबे येथील दोन्ही भूयारी मार्गांना आपल्या प्रयत्नातून मंजुरी मिळाली आहे.

येत्या काळात उजनी बॅकवॉटर परिसरातील गावात दळणवळण मजबूत करण्यासाठी गोयेगाव, पोमलवाडी, ढोकरी पुल होण्यासाठी शासनस्तरावर पाठपूरावा करणार आहे. तसेच वाशिंबे जिल्हा परिषद शाळा ते नवीन भुयारी मार्गाला जोडणारा रस्ता व सोगाव म्हसोबा मंदिर ते जुने रेल्वे गेट नवीन भुयारी मार्ग रस्ता सिमेंट कॉंक्रिट करणे व दलित बांधवांसाठी बौद्ध विहार बांधण्यासाठी जिल्हा नियोजन मंडळातून निधीची तरतूद करणार आहे.

# आर्याच्या गायन मैफिलीने रसिक भारावले



अक्कलकोट : स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या मैफिलीत गायन करताना आर्या आंबेकर यांची भावमुद्रा.

अक्कलकोट/प्रतिनिधी

गणराया..!, नरसोबाच्या वाडीला जाईन..!, भाग्यदा लक्ष्मी बारम्मा..! श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ..! तारकमंत्र, विठ्ठल..! विठ्ठल...!!, निशंक हो.. निर्भय हो..!, अशा एक ना अनेक मराठी, हिंदी व कन्नड भावगीते व भक्तिगीतांनी ख्यातनाम गायिका आर्या आंबेकर यांच्या स्वर 'आर्या' 'एक भाव मैफिल' या सदाबहार कार्यक्रमाने श्रोते भारावले होते.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३७ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून, शुक्रवार सायंकाळी ७ वा. स्वर 'आर्या' एक भाव मैफिल, सादरकर्ते-आर्या आंबेकर व सहकलाकार मुंबई ह्या कार्यक्रमाने दुसरे पुष्प संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन स्टेट बँक ऑफ इंडिया अक्कलकोट शाखेचे व्यवस्थापक विकास खडतकर, भूमिअभिलेखच्या कार्यालयीन अधिक्षक संतोष बिराजदार, डॉ. मनोहर मोरे, डॉ. अर्जुन मुगुटराव, डॉ. अजिंक्य मुगुटराव, डॉ. आसावरी पेडगावकर, डॉ. विवेकानंद करपे, डॉ. ॲड. विजय हर्डीकर, ॲड. भानुदास कोळी, ॲड. संतोष खोबरे, न्यासाचे लेखापाल ओंकारेश्वर उटगे यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान श्रींची प्रतिमा, नटराज व स्वर्गीय लता मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी लोकप्रिय मराठी भावगीते व भक्तिगीते सादरकर्ते-आर्या आंबेकर आणि सहगायक अजित विसपुते, तबला-आदित्य आटले, पखवाज डॉ. राजेंद्र दूरकर, रोहन वणगे, अनय गाडगीळ, रोहित कुलकर्णी, तालवाद्य सूर्यकांत सुर्वे, निवेदिका स्नेहल दामले यांच्यासह मान्यवरांचा न्यासाच्यावतीने सत्कार करण्यात आला. न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन संपन्न झाले. न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करण्यात आले.

यावेळी न्यासाचे विश्वस्त अलका भोसले, अर्पिताराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, हिरकणी संस्थेच्या जयश्री मगर, स्वाती निकम, स्मिता कदम, पल्लवी नवले, कविता वाकडे, क्रांती वाकडे, संगीता भोसले, अंजना पवार, उज्वला भोसले, कोमल क्षीरसागर, सुवर्णा घाडगे, छाया पवार, रुपा पवार व न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, सुरेशचंद्र सूर्यवंशी, दिलीप सिध्दे, राजेंद्र लिंतोटे, संतोष भोसले, लक्ष्मण पाटील, काशिनाथ गोळळे, मनोज निकम, प्रा. शरणप्पा आचलेर, अरविंद शिंदे, शीतल फुटाणे, राजू नवले, निखील पाटील, प्रवीण घाडगे, गोटू माने, संजय गोंडाळ, सौरभ मोरे, रोहित खोबरे, स्वामीराव मोरे, टिनू पाटील, महेश दणके, धनंजय गडदे, अमित थोरात, बाळासाहेब घाटगे, प्रसाद हुल्ले, गोविंद शिंदे, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी रसिक प्रेक्षकांचे स्वागत व आभार मानले. उत्कृष्ट लाईट व्यवस्था शंभूराजे इलेक्ट्रिकल यांनी केले.



पिलीव : नुतन चेअरमन व व्हाईस चेअरमन यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित संचालक.

## काळमवाडी विकास संस्थेच्या चेअरमनपदी इंदलकर

पिलीव/प्रतिनिधी

काळमवाडी (ता. माळशिरस) विकास सोसायटीच्या चेअरमन पदी सिताराम इंदलकर व व्हा. चेअरमनपदी रणजित काळे यांची बिनविरोध निवड झाली.

विद्यमान चेअरमन अशोक आसबे व दत्तू सूळ यांनी राजीनामे दिल्याने रिक्त पदांच्या निवडीसाठी संचालक मंडळाची बैठक पार पडली. यावेळी सहाय्यक म्हणून सचिव शैलेश आवताडे व गजानन गायकवाड यांनी काम पाहिले. चेअरमन पदासाठी सिताराम इंदलकर तर व्हाईस चेअरमन पदासाठी संचालक रणजित काळे यांचे प्रत्येकी एकेक अर्ज दाखल झाल्याने दोघांना बिनविरोध विजयी घोषित करण्यात आले.

यावेळी संचालक सर्वश्री अशोक आसबे, दत्तू सूळ, भगवान अवताडे, ॲड. नंदकुमार अवताडे, प्रकाश अवताडे, हनुमंत भोसले, पांडुरंग माने, महादेव भोसले, भामाबाई पवार, आनंदी शिंदे, संजय शिंगाडे, अमोल अवताडे, भारत माने, माजी चेअरमन दत्तात्रय अवताडे, माजी सरपंच दादासाहेब शिंगाडे ,अशोक आसबे ,दत्तु सूळ, युवराज इंदलकर, रामचंद्र पवार, प्रकाश अवताडे, शब्बेकदिर पठाण अमोल अवताडे, रामचंद्र पवार अशोक इंदलकर माजी सरपंच सुदाम शिंदे आप्पासाहेब इंदलकर युवराज इंदलकर शहाजी इंदलकर आदी उपस्थित होते.

# सिमेंटची गाडी पाठवून देतो म्हणून ७४ हजारांची फसवणूक

अक्कलकोट/प्रतिनिधी

येथील एका नवोदित व्यापाऱ्याला अनोळखी मोबाईल क्रमांकावरून अनोळखी व्यक्तीने सिंमेटची गाडी पाठवून देतो असे सांगून फोन पेद्वारे दिलेल्या बँक अकाऊंटला एकूण चौऱ्याहत्तर हजार रूपये पाठविले असता सिमेंट पाठवून न देता फसवणूक केल्याबद्दल अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल झाला.





फिर्याद ठेकेदार अजीज राजेभाई दुमडे (वय २१ वर्षे) रा. कोरबू प्लॉट अक्कलकोट यांनी दिली. याबाबत पोलीस सूत्राकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, फिर्यादीने हत्ती तलावजवळ सिमेंट दुकानाकरीता भाडे तत्वावर गाळा घेतला आहे. ६ जुलै रोजी दुपारी २.४२ वा. च्या सुमारास मोबाईल नंबरावर वरून कॉल करून सिंमेट एजन्सीबद्दल विचारले.

पहिल्यांदा वीस हजार डिपॉझिट भरायला सांगितले. आधीच्या इफुल सरांची बदली झाली असे सांगून त्यांनी ऑर्डर फॉर्म सोबत आधारकार्ड, पॅनकार्ड ७ जुलैला पाठविले. फिर्यादीस झुआरी सिमेंट कंपनीने इनव्हाईस पाठविले. फोन पे द्वारे दोन वेळेस २८ हजार दोनशे असे एकूण ५६ हजार चारशे रूपये बँकेचे खाते कमांक ब्रॅन्च बैंगलोर यावर पाठविले. ८ जुलैला एनओसीकरीता १७ हजार ६०० रूपये फोनपेद्वारे पाठवून दिले. एनओसीवर पाठवलेल्या गाडी नंबर (एम.एच.०४ बी. जी. १३९१) व गाडीचा ड्रायव्हर मोबाईल नंबरवर असे नमूद होते. परत विम्याचे २२ हजार ३०० पाठविण्यास सांगितले असता पैसे नाहीत ऑर्डर रद्द करा असे सांगितले. कंपनीला थेट फोन करून विचारपूस केली असता कंपनी ऑनलाईन पध्दतीने सिमेंटची विक्री करत नाही असे सांगितले. सिमेंट न पाठवता फसवणूक केली म्हणून अज्ञाताविरोधात उत्तर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला. अधिक तपास हवालदार रफीक शेख हे करीत आहेत.कोणत्याही क्रमांकवरुन फोन आल्यास मेसेज करु नये असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले.

# आयआरडीएनुसार विमा (इन्श्युरन्स) म्हणजे काय? आवश्यक का आहे?

सोलापूर/प्रतिनिधी

विमा हे आर्थिक नुकसानीपासून संरक्षणाचे एक साधन आहे ज्यामध्ये, फीच्या बदल्यात, पक्ष विशिष्ट नुकसान, नुकसान किंवा इजा झाल्यास दुसऱ्या पक्षाला भरपाई देण्यास सहमत आहे. हा जोखीम व्यवस्थापनाचा एक प्रकार आहे, जो प्रामुख्याने एखाद्या आकस्मिक किंवा अनिश्चित नुकसानीच्या जोखमीपासून संरक्षण करण्यासाठी वापरला जातो. फायर इन्शुरन्स कंपनी नॉर्विच युनियनची जाहिरात, कव्हरेज आणि सशुल्क विमामधील मालमत्तेची रक्कम दर्शविते. १९१० नुसार विमा प्रदान करणारी संस्था विमा कंपनी, विमा कंपनी, विमा वाहक किंवा अंडरराइटर म्हणून ओळखली जाते. विमा खरेदी करणारी व्यक्ती किंवा संस्था पॉलिसीधारक म्हणून ओळखली जाते, तर पॉलिसी अंतर्गत समाविष्ट असलेली व्यक्ती किंवा संस्था विमाधारक म्हणून ओळखली जाते. विमा व्यवहारात पॉलिसीधारकाने विमाधारकाला विमा कंपनीला देयकाच्या रूपात हमी दिलेले, ज्ञात आणि तुलनेने लहान नुकसान गृहीत धरले जाते (एक प्रीमियम) विमा कंपनीने कव्हर केलेले नुकसान झाल्यास विमाधारकाला भरपाई देण्याच्या आश्वासनाच्या बदल्यात.





तोटा आर्थिक असेल किंवा नसेल, परंतु तो आर्थिक अटींनुसार कमी करता येण्याजोगा असला पाहिजे. शिवाय, यामध्ये सहसा असे काहीतरी समाविष्ट असते ज्यामध्ये विमाधारकास मालकी, ताबा किंवा पूर्व-अस्तित्वात असलेल्या संबंधांद्वारे स्थापित विमा करण्यायोग्य व्याज असते. विमाधारकाला एक करार प्राप्त होतो, ज्याला विमा पॉलिसी म्हणतात, ज्यात विमाधारक किंवा त्यांचे नियुक्त लाभार्थी किंवा नियुक्त केलेल्या अटी आणि परिस्थितींचा तपशील देते. विमा पॉलिसीमध्ये नमूद केलेल्या कव्हरेजसाठी विमा कंपनीकडून पॉलिसीधारकांकडून आकारलेल्या रकमेला प्रीमियम म्हणतात . विमाधारकाला विमा पॉलिसीद्वारे संभाव्यत: कव्हर केलेले नुकसान अनुभवल्यास, विमाधारक दावा समायोजकाद्वारे प्रक्रिया करण्यासाठी विमा कंपनीकडे दावा सादर करतो. विमा कंपनीने दावा भरण्यापूर्वी विमा पॉलिसीसाठी आवश्यक असलेला अनिवार्य खर्च वजावट (किंवा आरोग्य विमा पॉलिसीद्वारे आवश्यक असल्यास, सह-पेमेंट) असे म्हणतात. विमाकर्ता पुनर्विमा घेऊन स्वतःची जोखीम हेज करू शकतो, ज्याद्वारे दुसरी विमा कंपनी काही जोखीम उचलण्यास सहमती दर्शवते, विशेषत: जर प्राथमिक विमा कंपनीने जोखीम वाहून नेण्याइतकी मोठी आहे असे मानले जाते.

धकाधक्कीच्या प्रवासात माणूस कधीही घटनाग्रस्त होऊ शकतो, आपल्या वाहनांची किंवा संपत्तीचे नुकसान झाल्यास, कमीत-कमी वैयक्तिक विमा असलाच पाहिजे, आपल्या नातेवाईकांवर आर्थिक ताण पडणार नाही.

# कामोणे तलावात पाणी आणण्याची धमक केवळ नारायण आबा पाटील यांच्यातच : बागल

करमाळा/प्रतिनिधी

तालुक्यातील कामोणे तलावात पाणी आणण्याची धमक केवळ नारायण आबा पाटील यांच्यातच आहे, शेतकऱ्यांनी सत्ता परिवर्तनास तयार राहावे, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक देवानंद बागल यांनी केले. माजी आमदार नारायण पाटील यांच्या जनसंवाद गावाभेट दौऱ्यात कामोणे येथील कॉर्नर बैठकीत ते बोलत होते.

यावेळी देवानंद बागल म्हणाले की, 'रावगाव गट आणि मांगी परिसरातील जनता आता बदल करण्याच्या मानसिकतेत आहें. माजी आमदार नारायण आबा पाटील यांनी सन २०१४ ते २०१९ या पंचांवार्षिकमध्ये केलेली कामे जनता विसरलेली नाही. यामुळे आता विकास काळ परत एकदा यावा म्हणून सन २०२४ ची विधानसभा निवडणूक जनता हातात घेणार आहे. नारायण आबा पाटील यांना आमदार करण्यासाठी आमचा रावगाव गट आघाडी वर असेल. कामोणे, बिटरगाव श्री, पुनवर, आळजापूर, वडगाव उत्तर, खडकी आदी गावातून शेतकरीवर्ग शेतीसाठी कायमस्वरूपी पाण्याची अपेक्षा माजी आमदार नारायण आबा यांच्यासमोर बोलून दाखवत आहेत. यामुळे भविष्यात या भागाला बागायत बनवण्यासाठी आता सत्तेत बदल निश्चित होणार आहे. 'लोकसभा तो झाकी थी, विधानसभा अभी बाकी है' असेही देवानंद बागल यांनी यावेळी ठामपणे सांगितले.

यावेळी माजी आमदार नारायण पाटील, पंचायत समितीचे उपसभापती दत्ताकाका सरडे उपस्थिती होते. या बैठकीसाठी पंकज नलावडे, अरुण काळे, सुहास जाधव, बाळू शिंदे, चिंटू भालेराव, विकास कांबळे, औदुंबर

# संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचे भक्तिमय वातावरणात स्वागत

**विठ्ठल नामाचा गजर; भक्तीचा फुलला मळा**

श्रीपूर/प्रतिनिधी

श्रीपूर तालुका माळशिरस येथे जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे भक्तिमय आनंदमय वातावरणात स्वागत करण्यात आले. जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचा अकलूज येथील मुक्काम संपवून पालखी सोहळा माळीनगरमार्गे तेथील विसावा घेऊन पंचवीस/चार महाळुंग मार्गे सायंकाळच्या सुमारास श्रीपूरमध्ये पोहोचला. श्रीपूर येथे कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी कारखान्याच्या प्रवेशद्वारावर कारखान्याचे व्हाईस चेअरमन कैलासराव खुळे तसेच



श्रीपूर : जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे वेळापूर नगरीत स्वागत करण्यात आले.

डॉ. यशवंत कुलकर्णी व वृषाली कुलकर्णी यांच्या हस्ते संत तुकाराम महाराज यांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले तसेच यावेळी कारखान्याचे संचालक दाजी पाटील, तानाजी वाघमोडे, लक्ष्मण धनवडे, बाळासाहेब यलमार, गंगा मामा विभुते तसेच मुख्य केमिस्ट एम. आर. कुलकर्णी, मुख्य लेखपाल रवींद्र काकडे, केन मॅनेजर संतोष कुमठेकर, ऊस विकास अधिकारी सोमनाथ भालेकर, तानाजी भोसले, रमेश गाजरे, समिर सय्यद, मारुती उपासे, हनुमंत नागणे, एस. आर. पाटील, कार्यालयीन अधीक्षक भीमराव बाबर, युनियनचे विजय पाटील, अनंत जाधव इत्यादी अधिकारी व कामगार वर्ग यांनी पालखीतील पादुकाचे दर्शन करून पालखी सोहळ्याचे स्वागत केले.

त्यानंतर पालखी सोहळा छत्रपती शिवाजी महाराज चौकात आल्यानंतर संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे ब्रिमा सागर डिस्टलरीज लिमिटेड श्रीपूर कारखान्याच्या प्रवेशदारावर कारखान्याचे कारखान्याचे जनरल मॅनेजर दिनकर बेंबळकर, डे. मॅनेजर चंद्रकांत भागवत, नरेश पाठक यांच्यासह अधिकारी वर्ग, कामगार यांनी पादुकांचे दर्शन घेऊन पालखी सोहळ्याचे स्वागत केले. यावेळी कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने वारकऱ्यांना केळीचे वाटप करण्यात आले तर ब्रिमा सागर डिस्टलरीज लिमिटेड श्रीपूर कारखान्याने पालखी

# ज्येष्ठ पत्रकार अविनाश कुलकर्णी यांचे निधन

सोलापूर/प्रतिनिधी



सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार अविनाश व्यंकटेश कुलकर्णी यांचे अल्पशा आजाराने शनिवार दि. १३ रोजी सायंकाळी निधन झाले. ते ६४ वर्षाचे होते. त्यांची अंत्ययात्रा रविवार दि. १८ जुलै रोजी स. ८ वा. पत्रकार नगर, रिमांड होमसमोर येथील राहत्या घरातून निघणार आहे. त्यांच्यावर मोदी स्मशान भूमीवर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

त्यांच्या मागे थोरले बंधू अजित, पती नीता, मुलगी सुप्रिया असा परिवार आहे. थंडी-ताप जाणवू लागल्यानंतर त्यांना गेल्या आठवड्यात अश्विनी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचाराने त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली होती मात्र, शुक्रवार दुपारनंतर त्यांची प्रकृती ढासळत गेली. अविनाथ यांनी सोलापुरातील 'केसरी गर्जने' या दैनिकात बरीच वर्षे पत्रकार म्हणून काम पाहिले होते. त्यानंतर चॅनेल आणि काही दैनिकातूनही त्यांनी पत्रकारिता केली. सोलापूर महापालिकेच्या वृत्तांकनाचा त्यांना मोठा अनुभव होता. केसरींचे दिवंगत कार्यकारी संपादक व्यंकटेश तथा तात्या कुलकर्णी यांचे ते चिरंजीव होत.

## जाऊ देवाचिया गावा! देव देईल विसावा!!

# उभे रिंगण सोहळा पाहून माळीनगरवासियांच्या डोळ्याचे पारणे फिटले

माळीनगर/प्रतिनिधी

अकलूज येथील गोल रिंगण सोहळ्याचा आनंद घेवून तसेच अकलूजकरांचा पाहुणचार घेतल्यानंतर शनिवारी जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखीं सोहळ्याने माळीनगर(ता. माळशिरस)येथील विसाव्याच्या दिशेने प्रस्थान ठेवले. पालखीचे स्वागत करण्यासाठी माळीनगर येथील नागरिक आतूर झाले होते. घरासमोर रांगोळी काढून, दिंडी जेवणाची, वारकरी जेवणासाठी तयारी आणि पालखीच्या दर्शनाची ओढ आणि उत्साह सकाळपासूनच दिसून येत होता. माळीनगर हद्दीत प्रवेश करताच फटाक्याची आतषबाजी झाली. प्रथम पुढे पालखी सोहळ्याची चौघडा रथाचे आगमन झाले त्यानंतर टाळ-मृदुंगाच्या नादात वारकर्यांनी राम कृष्ण हरीचा गजर केला.माळीनगरात पालखी सोहळ्याचा उभे रिंगण सोहळा भक्तीभावाने पार पडला.

पालखी स्वागत करण्यासाठी दि. सासवड शुगर फॅक्टरीचे चेअरमन राजेंद्र गिरमे, माळीनगरच्या सरपंच अनुपमा एकतपुरे, उपसरपंच अतुल कांबळे,सहकार महर्षी कारखान्याचे संचालक विराजसिंह निंबाळकर, बिजवडीचे माजी सरपंच आण्णासाहेब शिंदे,विलास इनामके, अनिल एकतपुरे, तलाठी निहाल जाधव आदी उपस्थित होते. महामार्गावर दोन्ही बाजूंना वारकऱ्यांनी कडे केले आणि त्यातून मानाच्या अश्व आणि अश्वारूढ पताकाधारींने दोन फेर्या मारल्या त्यानंतर माऊली...माऊलीचा एकच गजर झाला. त्यानंतर वारकऱ्यांनी रिंगण झालेल्या ठिकाणची अश्वांची पायधूळ कपाळाला लावत. कुणी फुगड्या, फेर धरत आनंदोत्सव साजरा केला. रिंगणाचा नेत्रादिपक सोहळा डोळ्यात साठवत पुढे पालखी दि मॉडेल हायस्कूल मैदानाकडे मार्गस्थ झाली.



माळीनगर : जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचा उभे गोल रिंगण सोहळा शनिवारी असंख्य भाविकांच्या साक्षीने पार पडला

*जाऊ देवाचिया गावा!*
*देव देईल विसावा!!*

माळीनगर ता माळशिरस येथील उभे रिंगण आणि सकाळचा विसावा संपवून दु१२:००वाजता पालखीने पंढरीच्या दिशेने प्रस्थान केले. रामकृष्ण हरि, ज्ञानोबा तुकाराम गजर करत पालखी मार्गस्थ झाली. पालखीच्या स्वागतासाठी सकाळ पासून महिला, पुरुष आणि लहान बालकांमध्ये उत्साह दिसून येत होता. पालखीच्या दर्शनाची ओढ लागली होती. त्यामुळे पालखीची वाट पाहत रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली होती. खेळणी, फुगे, महिलांच्या सौंदर्य वस्तू, ग्रहोपयोगी वस्तूची दुकाने थाटली होती तिथे खरेदीसाठी लगबग दिसून येत होती. माळीनगर नंतर गट नंबर दोन, पंचवीस चार येथून लवंग हद्दीत पालखीच्या स्वागताची जय्यत तयारी ग्रामपंचायत लवंग यांचे वतीने करण्यात आले होते. दुपारी ३:३०वाजता पालखीचे आगमन आणि वरूण राजाचे आगमन झाले. लवंग येथे पालखीचे स्वागत सरपंच प्रशांत पाटील, उपसरपंच प्रशांत भिलारे यांनी केले. याप्रसंगी माजी सरपंच उत्तम भिलारे, निशांत पाटील, युवराज वाघ, तानाजी रणसिंग, बिभीषण मलाणे, राहुल टिक, निवृत्ती कदम,दत्तात्रय चव्हाण,सिताराम वाघ, नितीन वाघ, पप्पू चव्हाण, दत्तात्रय वाघ, श्रीमंत गायकवाड, किसन वाघमारे, यांच्यासहपंचक्रोशीतील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.




पंढरपूर : 'स्वच्छ वारी-स्वस्थ वारी-निर्मल वारी-हरित वारी आषाढी वारी २०२४'च्या वारीपुर्व स्वच्छता मोहिमेचे उदघाटन करताना प्रा. डॉ.बी.पी. रोंगे.

## स्वेरीकडून आषाढीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

पंढरपूर/प्रतिनिधी

आषाढी एकादशी बरोबरच इतर महत्वाच्या तीनही मोठ्या वाऱ्यांमध्ये स्थापनेपासूनच स्वेरीचे योगदान राहिलेले आहे. पंढरीत वारीनिमित्त परंपरेनुसार संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर माऊली, संत सोपान काका, संत मुक्ताबाई, संत तुकाराम महाराज, संत एकनाथ महाराज, संत नामदेव महाराज, संत जनाबाई, संत गोरोबा काका (गोरा कुंभार), संत सेना महाराज अशा अनेक संतांच्या मानाच्या पालख्या पंढरीत येत असतात त्यामुळे पंढरीत वारकऱ्यांची मांदियाळी भरते. वारकऱ्यांच्या सेवेसाठी आरोग्य विभाग, स्थानिक प्रशासन, नगरपालिका व सुरक्षा बंदोबस्तासाठी पोलीस प्रशासन यांचाही मोठा ताफा असतो. यावेळी पंढरपुरातील गर्दीचे नियोजन करण्यासाठी तसेच वारकऱ्यांच्या सेवेसाठी स्वेरींकडून प्रशासनास सहकार्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. यावर्षीही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग, स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर (ऑटोनॉमस), स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, (पॉलिटेक्नीक), पंढरपूर स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर व स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी (पॉलिटेक्नीक), पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्वच्छ वारी-स्वस्थ वारी-निर्मल वारी-हरित वारी -आषाढी वारी २०२४' चे आयोजन केले गेले आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून आज वारी पूर्व स्वच्छतेचे गोपाळपुरात आयोजन करण्यात आले.

**'वारीपूर्व स्वच्छतेचा निर्मल वारी' हरित वारी उपक्रम**

# नगर पालिकेच्या कर्तव्यतत्परतेने अकलूजनगरी झाली चकाचक

## आषाढी वारी ही स्वच्छतेची वारी : १८० स्वच्छता कर्मचाऱ्यांनी १७ टन कचरा पाच तासात उचलला

सोलापूर/प्रतिनिधी

यावर्षी आषाढी वारी निमित्त जिल्हा प्रशासनाने स्वच्छतेला खूप प्राधान्य दिलेले आहे. पालखी मार्ग व पंढरपूर शहरात स्वच्छतेच्या सुविधा कोणतीही कमतरता राहू नये यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद स्वतः लक्ष घालून प्रत्येक ठिकाणी भेट देत आहेत व तेथील सुविधांची पाहणी करत आहेत. जगद्गुरू श्री तुकाराम महाराज यांची पालखीचे सराटी येथे जिल्ह्यात आगमन झाले, त्यानंतर अकलूज येथील सदाशिव माने महाविद्यालयात जिल्ह्यातील पहिले रिंगण झाले व अकलूज येथेच पालखीचा मुक्काम होता.



अकलूज : आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर अकलूज शहरातील महत्वाच्या ठिकाणी स्वच्छता करताना कर्मचारी.

अकलूज नगर परिषदेच्या वतीने पालखीच्या पार्श्वभूमीवर अकलूज शहरात पालखी मार्ग सदाशिव माने महाविद्यालय, दिंड्याच्या मुक्कामी ठिकाणी सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिलेल्या होत्या. त्यामध्ये शेकडो शौचालये, हिरकणी कक्ष, आरोग्य पथक पिण्याचे स्वच्छ पाणी या सुविधांच्या समावेश होता. दिनांक १२ जुलै रोजी सकाळी साडेअकरा वाजता सदाशिव माने महाविद्यालयात नेत्रदीपक असे रिंगण झाले. हा रिंगण सोहळा पाहण्यासाठी तसेच पालखीचे दर्शन घेण्यासाठी अकलूज शहरातील हजारो नागरिक जय हरी विठ्ठल चा गजर करत उपस्थित होते.

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखीचा मुक्काम अकलूज येथे होता. सर्व सोयीसुविधा उपलब्ध केलेल्या होत्या. शनिवारी सकाळी पालखी अकलूज येथून पंढरपूरच्या दिशेने निघाली. त्यानंतर अकलूज नगर परिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सफाई कर्मचाऱ्यांनी पालखीच्या मुक्कामी ठिकाणी तसेच अकलूज शहरातील दिंड्या मुक्कामी असलेल्या ठिकाणची स्वच्छता मोहीम अत्यंत तत्परतेने हाती घेतली.

अकलूज शहराच्या साफसफाईसाठी १८० कर्मचारी २२ घंटागाड्या, ६ पाणी टँकर, १ मैला टँकरच्या सहाय्याने २५ ते ३० किलोमीटरचे रस्ते गल्लीबोळे, तसेच जिथे जिथे दिंड्या मुक्कामी होत्या अशा सर्व शाळा केवळ चार ते पाच तासात स्वच्छ केल्या. यावेळी १७ टन कचरा गोळा झाला. स्वच्छता झाल्यानंतर सर्व ठिकाणी जंतनाशक पावडर टाकण्यात आली व लॉगिन मशीन ने फवारणी ही करण्यात आली. संपूर्ण पालखी मार्ग व अकलूज शहर स्वच्छ करण्यात आले. ही स्वच्छता मोहीम राबवत असताना सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने हॅन्ड ग्लोज व मास्क देण्यात आलेले होते. आषाढी वारी ही स्वच्छतेची वारी असल्याने जिल्हा प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे अकलूजचे मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी अत्यंत काटेकोरपणे पालन करून संपूर्ण शहर व पालखी मार्ग स्वच्छ केला. अकलूज नगरपरिषद व मुख्याधिकारी दयानंद गोरे स्वच्छतेच्या कामाबद्दल जिल्हाधिकारी कुमार आशीर्वादाने कौतुक केले. याच पद्धतीने संपूर्ण पालखी मार्ग व मुक्कामी ठिकाणी संबंधित स्थानिक प्रशासनाकडून देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

## कुचन प्रशालेत नयनरम्य रिंगण सोहळा

सोलापूर : आषाढी वारी निमित्ताने .पद्मशाली शिक्षण संस्था संचलित, कुचन प्रशालेच्या वतीने विठूनामाचा जयघोष करीत प्रतिकात्मक दिंडी काढण्यात आली. या दिंडीत संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज यांच्या जयघोषात, टाळ, मृदंग वाजवत वारकरी वेशभूषेतील विद्यार्थ्यांच्या जयघोषाने दिंडीची शोभा वाढविली.कुचन प्रशालेतील चि. हेमंत निगडी याने विठ्ठलाचे साजरे रूप धारण केले होते तर रुक्मिणीच्या वेषात कु. संजना इंगळे होती. तसेच कुचन प्रशालेतील अनेक विद्यार्थी दिंडीत सहभागी होता आल्याने अत्यानंदात विठूनामात तल्लीन झालेले दिसून आले.

प्रारंभी विठ्ठल रुक्मिणीचे पूजन प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगू , प्रणिता सामल , मल्लिकार्जून जोकारे व सर्व शिक्षकांच्या हस्ते करण्यात आले .विद्यार्थ्यांना संत परंपरा व वारकरी संप्रदायाची ओळख व्हावी या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन केल्याचे प्राचार्य युवराज मेटे यांनी यावेळी सांगितले.

प्रशालेच्या प्रांगणात गोल रिंगण सोहळ्यात पाचवीच्या विद्यार्थ्यांनी टाळ मृदुंग तालावर वारकरी फुगडीचा फेर धरला. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी माऊली माऊली या गाण्यावर काठवट व डोळ्याचे पारणे फेडणारा रिंगण सोहळा सादर केला. यासाठी प्रशालेच्या सहशिक्षिका अनुप्रिता हजारे यांनी विशेष परिश्रम घेतले तसेच माधुरी कुलकर्णी, अविनाश जतकर, सागर दुर्गी, रजनी बोलाबत्तीन, पल्लवी ननवरे यांचे सहकार्य लाभले .



सोलापूर : कुचन प्रशालेत बाळ गोपाळांचा आषाढी सोहळा भक्तीभावात पार पडला.

# अर्धनारी नटेश्वर नगरीत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्याचे भक्तीभावाने स्वागत

महादेव जाधव/वेळापूर

**वेळापुरात ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा विसावला**

**वेळापूर ग्रामपंचायतचे नेटके नियोजन**

**पालखी तळावर वेळापूर ग्रामपंचायतीच्या वतीने उभारण्यात आलेल्या विठ्ठलाच्या मूर्तीचे लाखो वारकऱ्यांनी घेतले दर्शन**

१३ जुलै रोजी संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचे ग्रामदैवत अर्धनारी नटेश्वर च्या वेळापूर नगरीत ढगाळी वातावरणात तोफांच्या सलामीने उत्साही भक्तिमय वातावरणात वैष्णवांचा हरिनामाच्या जयघोषात स्वागत करण्यात आले.

वेळापूर ग्रामपंचायत च्या वतीने संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा मार्केट कमिटीचे संचालक उत्तमराव जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली सोहळ्याचे उत्तम असे नियोजन करण्यात आले होते.

संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा वेळापूर ग्रामपंचायतीच्या हद्दीत येताच वेळापूर ग्रामपंचायतीचे सरपंच रजनीश बनसोडे व उपसरपंच नानासाहेब मुंगूसकर यांच्यावतीने पालखी सोहळ्याचे तोफांची सलामी देऊन वेळापूर वेळापूर ग्रामपंचायतीच सदस्य , तानाजी काका चव्हाण, हनुमंत वायदंडे, प्रियंका आडत, सीमा खाडे , अंजना माने, विमल जाधव, छाया साठे, यांच्यावतीने पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यात आले. तसेच यावेळी सोसायटी चेअरमन अमरसिंह माने देशमुख वीरकुमार दोशी, डॉ धनंजय म्हेत्रे अजीत बनकर, यांनी ज्ञानेश्वर महाराज यांच्या पादुकांचे दर्शन घेतले.

माळशिरस येथील मुक्कामानंतर संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा वेळापूरनगरी कडे मुक्कामासाठी निघाला विठ्ठल नामाचा जयघोष व टाळ मृदंगाच्या गजरामुळे आसमंत दुमदुमून गेला होता. पिसेवाडी फाटा येथे ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती ४.३० च्या सुमारास पालखी सोहळ्याचे वेळापुर हद्दीत आगमन झाले. वेळापूर येथे माऊलींच्या दर्शनासाठी भाविक व ग्रामस्थांनी दुपारपासूनच इको बोर्ड जवळ गर्दी केली होती.

*तुका म्हणे धावा आहे पंढरी विसावा !*

या तुकाराम महाराजांच्या उक्ती प्रमाणे वैष्णवांची पावले विठुरायाच्या दर्शनाच्या ओढीने '' धुमाळी '' या उतारावरून वैष्णवांनी धावा घेऊन पंढरी समीप आल्याचा आनंद व्यक्त केला.

विसाव्याच्या ठिकाणी आल्यानंतर संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांची विसावा येथे अॅड. रामचंद्र ताटे व सौ अश्विनी ताटे यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. पालखी विसावा कट्ट्याचे सेवेकरी ह. भ. प. महादेवभाऊ ताटे यांचा पालखी विश्वस्त यांनी श्रीफळ व प्रसाद देऊन सन्मान केला. यानंतर विसावा येथे परंपरेप्रमाणे शेंडगे यांची तीन नंबरची दिंडी यांच्या वतीने मानाचे भारुड सादर केले. यावेळी भक्तीमध्ये तल्लीन होऊन वैष्णवांची विविध सोंगे सादर करून भारुड संपन्न झाले.

यानंतर माऊलींची पालखी तरुणांनी खांद्यावर घेऊन ज्ञानेश्वर माऊलींचा जयघोष करत पालखी चौकातील विश्रांतीच्या ठिकाणी येत असताना मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या भाविकांनी ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांवर पुष्पवृष्टी केली. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते उत्तमराव जानकर वेळापूर माजी सौ विमलताई उत्तमराव जानकर धानोरे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच जीवन जानकर दादासाहेब घाडगे वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे उपसरपंच नानासाहेब मुंगूसकर रिपाई आठवले माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे संजय देशपांडे यांच्यासह असंख्य भाविकांनी ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांचे दर्शना घेतले सायंकाळी पालखी सोहळा वेळापूर नगरीत पोचल्यानंतर भाविकांनी दर्शनासाठी एकच गर्दी केली होती. त्यामुळे परिसर भक्ती रसात नाहून निघाला होता. पालखी तळावर ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांची समाज आरती झाल्यानंतर दिंडीतील वारकऱ्यांनी राहूट्याकडे धाव घेतली.



वेळापूर : अर्धनारी नटेश्वर नगरीत संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे भक्तीभावाने स्वागत करण्यात आले.

### वेळापुर ग्रामपंचायतीचा वारकऱ्यांच्या सेवेचा वेगळा उपक्रम

त्याचबरोबर वेळापूर ग्रामपंचायतीच्या वतीने पालखी चौक येथे आरोग्य विभाग कक्ष, हिरकणी कक्ष, आपत्तीकालीन व्यवस्थापन कक्ष याची उभारणी करून मोठ्या प्रमाणात वारकऱ्यांची सेवा केली त्याचबरोबर वेळापूर ग्राम पंचायतीच्या वतीने वारकऱ्यांसाठी मसाज कक्ष निर्माण करून तेथे पालखी सोहळ्या बरोबर दिवसभर चाललेल्या थकलेल्या आनेक वारकऱ्यांच्या पायांना मसाज मशीनच्या माध्यमातून मसाज करून पायांना आराम देण्याचे मोठे काम करण्यात आले. त्याचबरोबर या ठिकाणी वारकऱ्यांना झेंडू बाम मलम विक्स चे वाटपहि करण्यात आले तसेच मसाज कक्षामध्ये वारकांच्या तुटलेल्या चप्पल चे शिवणकाम, कपडे इस्त्री , केशर्कतनालय, फाटलेल्या कापडांना शिलाई आदि. मोफत सुविधा देण्यात आल्या होत्या.

पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांसाठी वेळापूर ग्रामपंचायतीच्या वतीने १० विहिरी ताब्यात घेऊन तेथून पालखी सोहळ्या बरोबर आलेल्या टँकर मध्ये पाणी भरण्याची सोय करण्यात आली होती. वेळापूर येथील पालखी सोहळ्यातील मुक्कामी बंदोबस्त सोलापूर जिल्हा अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, अकलूज पोलीस उपविभागीय अधिकारी नारायण शिरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी यांनी पालखी सोहळा पार पाडण्यासाठी ७०० पोलीस कर्मचारी व अधिकारी यांचा बंदोबस्त चोख ठेवला होता. त्याचबरोबर पालखी सोहळ्यातील मुक्कामी वारकऱ्यांसाठी वेळापूर शहरातील १४ ठिकाणी १८०० मोबाईल टॉयलेटची महिलांनसाठी व पुरुषांनसाठी स्वतंत्र सोय करुन पाण्याची व लाईटची सोय करण्यात आली होती.

त्याचबरोबर पालखी तळावरील वारकऱ्यांची स्वच्छ पाण्याची सोय होण्यासाठी १७ स्टॅन्ड पोस्टद्वारे उभारणी करण्यात आली होती. तसेच पालखीतळ व बुद्धविहार येथे महिलांसाठी विश्रांती कक्ष व १३० स्नानगृहांची सोय करण्यात आली होती. पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना प्लास्टिक कचरा टाकण्यासाठी सोय करण्यात आली होती. संत ज्ञानेश्वर महाराज पालखीतळ हा परिसर प्रकाशमय करण्यात आला होता. तसेचरात्रीच्या वेळी हाय मस्ट दिव्याच्या उंच खांबानवर डिजीटल लायटिंग लावण्यात आले होते. त्याचबरोबर पालखीतळ्याच्या स्वागत कमानीवर लायटिंग लावले होते त्यामुळे रात्रीच्या अंधारातहा परिसर प्रकाशमय खुलुन दिसत होता. तसेच वेळापूर ग्रामपंचायतीच्या वतीने पालखीतळा वर सोडण्यात आलेला वारकऱ्यांच्या स्वागताचा बलून वारकरी बांधवांच्या नजरा आकर्षित करत होत्या .

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्या मध्ये यावर्षी वेळापूर ग्रामपंचायतच्या वतीने वारकऱ्यांचे दैवत विठ्ठलाची साडेबारा फूट मूर्ती प्रवेशद्वाराजवळच बसवण्यात आली होती पालखी सोहळ्यात येणाऱ्या वारकऱ्यांनी विठुरायाचे दर्शन घेतले

महावितरणच्या वतीने २४ तास वीज पुरवठा सुरळीत ठेवला होता . वेळापूर ग्रामपंचायतीच्या वतीने पालखी काळात भाविकांना पादुकांचे सुलभ दर्शन व्हावे यासाठी दर्शन रांगेची उत्तम अशी सोय करण्यात आली होती. तसेच वेळापूर ग्रामपंचायतीच्या वतीने वारकऱ्यांच्या विश्रांतीसाठी दोन ठिकाणी मोठे मंडप उभारण्यात आले होते. आरोग्य विभागाच्या वतीने डॉ. बी. बी. ओव्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करून औषध गोळ्यांचे वाटप केले गेले.